वस्तूची स्थिती कशी आहे हे पाहण्याकरिता वापरली जाणारी ती पध्दती आहे. अर्थातच यातूनच पुढे भविष्यकाळाची वाट जाणार असल्याने वर्तमानकाळाच्या परिशिलनाने प्रगत भविष्यकाळ घडवावा हे एक अप्रत्यक्ष उद्दिष्ट असतेच.

विशिष्ट बाबतीत असलेल्या सद्य:स्थितीचे वर्णन करते आणि सद्य:स्थिती स्पष्ट करते. वर्तमानात असलेले संबंध, प्रचलित परिपाठात दिसून येणाऱ्या निष्ठा, दृष्टिकोन आणि अभिवृत्ती, सुरु असलेल्या प्रक्रिया, जाणवणारे परिणाम, विकसित होत असलेले विचारप्रवाह यांच्याशी ते संबधित असते. सर्वेक्षण किंवा वर्णनात्मक सर्वेक्षण निव्वळ माहिती संकलित करणे आणि पत्रके तयार करणे एवढ्यापुरते मर्यादित नाही तर, त्यात मापन, वर्गीकरण, अर्थनिर्वचन आणि मूल्यांकन यांच्या आधारे वर्णित विषयाचे स्पष्टीकरण, तुलना व सार्थकता असते.

सर्वेक्षणाच्या एका टोकाला निव्वळ माहितीचा कोश आहे; तर, दुसऱ्या टोकाला प्रयोग आहे. त्यामुळे निव्वळ माहिती संकलनाचा त्यात अंतर्भाव होतो तर प्रयोगशिलतेची व त्यातून अनुमान काढण्याची प्रवृत्ती आढळते. या दृष्टीने विचार करता सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन, वर्णन व स्पष्टीकरण आणि मूल्यांकन होय असे म्हणतात येईल. त्यात सर्वेक्षण आहे तसेच वर्णनही आहे.

सर्वेक्षणातून खालील तीन प्रकारची माहिती संकलित केली जाते.

अ) वर्तमान स्थिती


ब) अपेक्षित स्थिती

क) आवश्यक साधनांचा बोध.

सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते, कोणकोणत्या बाबी कोणत्या स्थितीत उपलब्ध होत आहेत याची माहिती कळते. समस्या निराकरणाकरिता स्थिती अपेक्षित आहे हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते व ही अपेक्षित स्थिती प्राप्त करुन समस्येची उकल करण्याकरिता कोणत्या साधनांची व प्रयत्नांची आवश्यकता आहे हे त्यामुळे कळते.

## ११. माहिती संकलनासाठी वापरलेली साधने व तंत्रे:

संशोधनामध्ये माहिती संकलित करण्यासाठी संशोधकास निरनिराळया साधनाचा व तंत्राचा वापर करावा लागतो.




संशोधनामध्ये वरील साधनांचा उपयोग करतांना संशोधकास कोणते उद्दिष्टे साधवायचे आहे त्यावरुन साधन उपयोगात आणावे हे ठरवावे लागते. सर्वच साधने सर्वच प्रकारची माहिती उपलब्ध करुन देवू शकत नाहीत.

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रश्नावली या साधनांचा उपयोग करुन माहिती संकलित केली आहे.

## १२. प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेले साधन : प्रश्नावली

प्रश्नावली म्हणजे प्रश्नाची यादी किंवा प्रश्नाची मालिका असा आपल्याला सरळ अर्थ घेता येईल. प्रश्नावलीत दिलेल्या प्रश्नाची उत्तरे ही प्रतिसादकाला स्वत: भरुन द्यावी लागतात. यात छापील स्वरुपात प्रश्नावली प्रतिसादकाकडे पाठवावे हे प्रश्न प्रतिसादक समजावून घेऊन उत्तरे देतो. संशोधन विषयाच्या संदर्भात या साधनाद्वारे संख्यात्मक व गुणात्मक अशी दोन्ही प्रकारची माहिती उपलब्ध होते. संशोधनाच्या विविध साधनामध्ये हे एक अत्यंत लोकप्रिय व फार मोठ्या प्रमाणात वापरले जाणारे असे साधन आहे.

विशेषतः सर्वेक्षण पध्दतीत या साधनांचा फार मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. प्रश्नावली ही प्रतिसादक स्वतः लिहित असल्याने अतिशय विश्वसनीय माहिती मिळवता येते.

प्रश्नावलीत प्रश्नाचे दोन प्रकार पडतात.

१) मुक्त प्रश्न

२) बध्द प्रश्न

## १) मुक्त प्रश्नः

ज्या प्रश्नाच्या उत्तरांची शब्दरचना प्रतिसादक स्वतःच्या शब्दांत करु शकतो त्या प्रश्नाचा समावेश मुक्त प्रश्न या गटात होतो.

## २) बध्द प्रश्नः

ज्या प्रश्नाचे उत्तर होय किंवा मत नाही यापैकी एका शब्दाने किंवा दिलेल्या उत्तरांपैकी एकाची निवड करुन किंवा प्रतिसादकाने होय किंवा नाही असे स्वतःचे शब्द वापरुन देतो अशा प्रश्नांना बध्द प्रश्न असे म्हणतात.

## अ) प्रश्नावलीः

**Bogardas** "A questionnaire is a list of questions to a number of persons for them to ensure. It scores standardized results that can be tabulated and treated statistically."

**Barr, David and Johnson,** "A systematic compilation of questions that are submitted to a sampling of population which information is desired."

म्हणजेच प्रश्नावलीत प्रश्नांचे व्यवस्थित संकलन केले जाते. हे प्रश्न नमुना गटास, प्रतिसादकांस दिले जातात. त्या प्रश्नावल्या भरुन आल्यानंतर त्यांचे वर्गीकरण केले जाते व प्रत्येक प्रश्नाचा संख्याशास्त्रीय पध्दतीने विचार केला जातो.

## ब) प्रश्नावलीचे वर्णनः

संशोधकाने उपयुक्त व संबंधित माहिती संकलनासाठी खालील प्रश्नावलीचा वापर केला आहे.

१) पहिली प्रश्नावली विद्यार्थीनीसाठी असून प्रश्नावलीत २७ विधाने आहेत. व विद्यार्थीनींना ५ पैकी कोणताही एक पर्याय उत्तर म्हणून म्हणून निवडायचा आहे.

२) दुसरी प्रश्नावली ही पालकांसाठी असून त्यात पालकांना १९ प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. त्यातून त्यांचे खेळाविषयक मत नोंदविण्यासाठी आवश्यक प्रश्न विचारलेले आहेत.

या वरील दोन्ही प्रश्नावल्या अहुवालिया यांच्या अभिवृत्ती चाचणीच्या आधारावर तयार करुन मराठीतून विचारण्यात आलेल्या आहेत. या प्रश्नावलीचा आधार घेउन विद्यार्थीनींचा अल्प सहीाग व पालकांच्या प्रवृत्तीचा अभ्यास करण्यात ओलेला आहे.

**ड) प्रश्नावलीचे गुण / फायदे :**

१. प्रश्नावलीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे प्रश्नावली एकाचवेळी वेगवेगळया आणि दूरवर पसरलेल्या समूहातील व्यक्तिकडे पाठविता येते. त्यांच्या माहितीचा लाभ घेता येतो.

२. प्रश्नावलीमध्ये प्रतिसादकाने दिलेल्या उत्तरांची गुप्तता राखण्याची तसेच प्रतिसादकांच्या नावाचा उल्लेख न करण्याची खात्री दिलेली असते. त्यामुळे जी माहिती वादग्रस्त स्वरुपाची, अप्रिय चारित्र्यास कालिमा लावणारी, इतरांना नाराज करणारी आणि स्वतःस हाणीकारक असल्याने इतरांना देणार नाही अशी माहितीसुध्दा प्रश्नावलीद्वारे मिळू शकते.

३. प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे लवकरात-लवकर किंवा ताबडतोब देण्यासाठी कोणाचे दडपण असत नाही. त्यामुळे प्रश्नावली मधले प्रश्न वाचून त्यावर योग्य तितका वेळ विचार करुन उत्तरे लिहिण्याची संधी प्रतिसादकास मिळते. परिणामतः संशोधकास निश्चित स्वरुपाची उत्तरे मिळविणे सुकर होते.

४. प्रश्नावलीतील वस्तुनिष्ठ प्रश्न / बध्द प्रश्नांच्या पर्यायामुळे प्रतिसादकाला उत्तरे देणे सोपे जाते. यामुळे प्रश्नाचे वर्गीकरण करुन संख्याशास्त्रीय विश्लेषण करणे सोपे जाते.

५. प्रश्नावली ही इतर साधनांपेक्षा कमी खर्चाची व वेळ वाचविणारी अशी आहे.

६. प्रश्नावली एकाचवेळी अनेक प्रतिसादकांकडे पाठविता येते.

७. प्रश्नावली पोस्टाने पाठवत असल्याने प्रतिसादकावर उत्तरे लिहिताना दडपण नसते.

८. उद्दिष्टानुसार प्रश्न रचना केलेली असल्यामुळे निष्कर्ष शोधता येतात.

९. प्रश्नावली या साधनाद्वारे विस्तृत व विशाल क्षेत्राचे अध्ययन करता येते.

१०. प्रश्नावलीद्वारे माहिती मागवायची असेल तर प्रतिसादकाला कोणतेही प्रशिक्षण देण्याची गरज नसते.

११. प्रश्नावलीमुळे प्रतिसादकांनी दिलेल्या वैयक्तिक व खाजगी प्रश्नांच्या उत्तराबाबतची गोपनीयता इतर साधनांच्या मानाने अधिक असते.

१२. प्रश्नावलीमुळे कमी खर्चात माहिती मिळविता येते.

१३. प्रतिसादक त्यांच्या बोलीभाषेत प्रश्नांची उत्तरे देत असल्यामुळे उत्तरांची वैधता अधिक असते.

१४. प्रश्नात सुसूत्रता क्रम असतो त्यामुळे प्रश्नावलीस आकारबध्दता येते, विश्लेषण, अर्थनिर्वचन करणे सोपे जाते.

१५. प्रश्नावलीची मांडणी सारणी स्वरुपात करणे सहज सोपे जाते.

१६. प्रतिसादकास उत्तर देण्याचा कंटाळा येत नाही.

१७. इतर साधनांच्या तुलनेत प्रश्नावली तयार करणे सोपे असते.

### इ) प्रश्नावलीचे संभाव्य तोटे / दोषः

१. काही वेळेस प्रतिसादक प्रश्नावली वेळेवर भरुन पाठवित नाही किंवा अपूर्ण स्वरुपात पाठवतात. त्यामुळे अशा उत्तरातून मिळणाऱ्या अपुऱ्या माहितीवरुन अनुमाने काढणे अवघड जाते.

२. काही वेळा प्रतिसादक प्रश्नावली भरुन पाठवित नाही.

३. ज्या व्यक्तिंना लिहिता वाचता येते आणि ज्यांच्यामध्ये प्रश्न समजण्याची पात्रता असते, अशाच व्यक्तिकडून प्रश्नावलीद्वारे माहिती मिळविता येते.

४. प्रश्नावलीत प्रतिसादकांनी उत्तरांची यथार्थता पारखून पाहण्याची सोय नसते.

### प्रश्नावली निवडण्याचे कारणेः

सदर संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दती निवड करण्यात आली असल्यामुळे संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पध्दतीसाठी उपयुक्त अशा प्रश्नावली साधनांची निवड करुन सदर संशोधन पूर्ण केले. प्रश्नावली हेच साधन संशोधनकार्यात निवडण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. सदर संशोधनात पालकांच्या अडचणीविषयी मते आजमावयाची होती.

२. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकास वस्तुनिष्ठ माहिती मिळवायची होती.

३. प्रश्नावलीद्वारे संख्यात्मक आणि गुणात्मक माहिती मिळवायची होती.

४. संशोधन नवीन असल्याने प्रश्नावलीच्या साहाय्याने विषयासंबंधी चाकोरीबध्द पुढे जायचे होते.

५. संशोधकास प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्टे, गृहितके, परिकल्पना यांची पुर्तता करुन निष्कर्ष ठरवायचे होते.

६. एकाचवेळी अधिक विद्यार्थीनी व पालकाकडून प्रश्नावली भरुन घेता येते.

७. लाजाळू व भिती वाटणारे प्रश्न प्रश्नावलीच्या माध्यमातून उत्तरे मिळविता येतात.

या वरील कारणांमुळे प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी प्रश्नावलीचा उपयोग केला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत असलेल्या महाविद्यालयातील मुली व पालक यांच्या अभिवृत्तीचा अभ्यास करण्यासाठी आदर्श न्यादर्श तत्त्व म्हणून प्रत्येक महाविद्यालयास भेट देवून मुली व त्यांच्या पालकांना भेटून सर्वांचीच माहिती गोळा करणे याबाबतीत काही न्यादर्श पध्दती ज्या उपलब्ध आहेत. त्यातील संशोधन कार्यास उपयुक्त ठरेल व माहिती संकलन होईल यासाठी एक सविस्तर सर्वांसाठी प्रश्नावली तयार केली व त्यांच्याकडून काही प्रत्यक्ष व कांही अप्रत्यक्ष पत्राद्वारे माहिती संकलन केली. या सर्व सकलनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर माहिती गोळा करण्यासाठी करण्यात आला. ५०० विद्यार्थीनी व ५०० पालक यांची या संशोधनात अभिवृत्ती शोधिका भरून घेण्यात आली. महाविद्यालयाचा व विद्यापीठांचा यांच्यात समावेश आहे. माहिती संकलनासाठी मानसशास्त्रातील आहुवालीया यांची अभिवृत्ती शोधिका सर्वांना देऊन ती सोडवून घेण्यात आली. या शोधिकेत सुरुवातीला प्रत्येकला सूचना दिल्या. या शोधिकेत एकूण विद्यार्थीनीसाठी २६ व पालकांसाठी १९ प्रश्न आहेत. प्रत्येक विधानाच्या अक्षरासमोर एकूण ५ पर्याय दिलेले आहेत. त्यांची उत्तरा साठी (✓) चिन्हाची खुण करावयाची आहे. अशा प्रकारे सर्वांकडून विधानांची प्रतिसाद घेण्यात आले.

पालकांसाठी संशोधनास पुरक असणाऱ्या प्रश्नावली तयार करुन त्यांच्याकडून अधिक वस्तुनिष्ठ, अचूक माहिती संकलनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. दिलेली माहितीची नोंद ठेवून व मुली यांच्याकडून प्रश्नावली भरुन घेत असताना संशोधनाविषयीची माहिती व निर्भिक पत्रे अचूक माहिती देण्यासाठी गोपनियतेची काळजी घेण्यासंबंधीही सूचना देण्यात आल्या. त्यामुळेही माहिती संकलित होऊ शकली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड वार्षिक अहवाल, महाविद्यालयातील वार्षिक अंक, विशेषांक, परिपत्रके, नोंद रजिस्टर, पटवहयांच्याद्वारे एकूण विद्यार्थी संख्या, मुला-मुलीचे वर्गीकरण केले. त्यामुळे मुलाच्या शिक्षणाच्या प्रमाणात मुलींच्या शिक्षणाची त्यातही क्रीडा क्षेत्रातील प्रमाण काढून प्रत्यक्ष महिला खेळाडूच्या कोणत्या समस्या आहेत.त्यात आणखी यश मिळविण्यासाठी कोण-कोणत्या बाबींकडे लक्ष वेधणे गरजेचे आहे यावर लक्ष केंद्रित केले आहे वर पालकांची अभिवृत्ती लक्षात घेवून मुली क्रीडाविश्वाविषयी माहिती संकलीत करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा मोठ्या प्रमाणात वापर केलेला आहे.

खालील तक्त्यामध्ये विद्यापीठ संकुल व संलग्न महाविद्यालयातील ५ वर्षाची विद्यार्थीनी संख्या दिलेली आहे.

## तक्ता क्र. १

## २००५-२०१० विद्यापीठातील एकूण विद्यार्थी व विद्यार्थीनींची संख्या

| | |
|---|---|
| **२००४-०५**<br>एकूण महाविद्यालये - १६७<br>विद्यापीठ संकुल - ०९<br>एकूण विद्यार्थी संख्या- ५२०३७<br>एकूण मुलींची संख्या - १८०६७ | **२००४-०५**<br>मुली / एकूण<br>विद्यापीठ २२७ / ६४१<br>नांदेड ७५९३ / २२५३७<br>परभणी/हिंगोली ४४१६ / ११५४६<br>लातूर ५८३१ / १७३१३ |
| **२००५-०६**<br>एकूण महाविद्यालये - २००<br>विद्यापीठ संकुल - ०९<br>एकूण विद्यार्थी संख्या- ६११३२<br>एकूण मुलींची संख्या - २०९२० | **२००५-०६**<br>मुली / एकूण<br>विद्यापीठ २१८ / ६६१<br>नांदेड ८०२७ / २५३१६<br>परभणी/हिंगोली ५३५९ / १३८७७<br>लातूर १३१६ / २१२७८ |
| **२००६-०७**<br>एकूण महाविद्यालये - २०३<br>विद्यापीठ संकुल - ०९<br>एकूण विद्यार्थी संख्या- ५९२१९<br>एकूण मुलींची संख्या - २१६८६ | **२००६-०७**<br>मुली / एकूण<br>विद्यापीठ २६१ / ७०२<br>नांदेड ८१८२ / २३२१०<br>परभणी/हिंगोली ५६११ / १४७४६<br>लातूर ७६३२ / २०५६१ |
| **२००७-०८**<br>एकूण महाविद्यालये - २८५<br>विद्यापीठ संकुल - १० | **२००७-०८**<br>मुली / एकूण<br>विद्यापीठ २७० / ७४१ |

<table>
<tr><td>एकूण विद्यार्थी संख्या- ६५८६०<br>एकूण मुलींची संख्या - २२२२५</td><td>नांदेड ८८९३ २६६१७<br>परभणी/हिंगोली ५७५१ १४२२५<br>लातूर ७३११ २४२७७</td></tr>
<tr><td>२००८-०९<br>एकूण महाविद्यालये - २८६<br>विद्यापीठ संकुल - ०९<br>एकूण विद्यार्थी संख्या- ७९१९३<br>एकूण मुलींची संख्या - २६१९३</td><td>२००८-०९<br>मुली एकूण<br>विद्यापीठ २७३ ७८९<br>नांदेड १००२७ ३२०३९<br>परभणी/हिंगोली ५७१७ १६७९२<br>लातूर १०१७६ २९५७३</td></tr>
<tr><td>२००९-१०<br>एकूण महाविद्यालये - ३५९<br>विद्यापीठ संकुल - ०९<br>एकूण विद्यार्थी संख्या- ८९१९३<br>एकूण मुलींची संख्या - ३६१९३</td><td>२००९-१०<br>मुली एकूण<br>विद्यापीठ ३२२ ८८०<br>नांदेड १०२८७ ३५४२६<br>परभणी/हिंगोली ६८१३ १८९२२<br>लातूर १११७६ ३०६६६</td></tr>
</table>

# तक्ता क्र. २

## विद्यापीठ संकुल व महाविद्यालयामधील मुले व मुलींची संख्या

## दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | इ.स. | एकूण महाविद्यालये | वि.संकुल | एकूण वि.संख्या | एकूण मुलींची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००४-०५ | १६७ | ०९ | ५२०३७ | १८०६७ | ३४.७५ |
| २ | २००५-०६ | २०० | ०९ | ६११३२ | २०९२० | ३४.४० |
| ३ | २००६-०७ | २०३ | ०९ | ५९२१९ | २१६८६ | ३६.०० |
| ४ | २००७-०८ | २८५ | १० | ६५८६० | २२२५ | ३३.७५ |
| ५ | २००८-०९ | २८६ | ०९ | ७९१९३ | २६१९३ | ३३.७५ |
| ६ | २००९-१० | ३५९ | ०९ | ८९११३ | ३६१९३ | ३५.५० |

१५

वरील तक्त्यावरुन असे आढळून येते की, इ.स.२००४-२००५ मध्ये स्वा.रा.ती.म.विद्यापीठाशी संलग्नित १६७ महाविद्यालये होती. त्यापैकी ०९ विद्यापीठ संकुल होते. या सर्व महाविद्यालय व संकुलमधील एकूण विद्यार्थी संख्या ५२०३७ होती. त्यापैकी विद्यार्थीनी संख्या १८०६७ अशी होती. म्हणजे एकूण संख्येचा ३४.७५% विद्यार्थीनी स्वा.रा.ती.म.वि. मध्ये शिक्षण घेत होत्या.

त्याचप्रमाणे २००५-२००६ मध्ये एकूण महाविद्यालये २०० व संकुल ९ यात एकूण विद्यार्थी संख्या ६११३२ अशी होती त्यापैकी २०९२० विद्यार्थीनी होत्या त्यांची सरासरी ३४.४० अशी होती.

२००६-२००७ मध्ये २३० महाविद्यालय व ९ संकुलामध्ये एकूण विद्यार्थी संख्या ५९,२१९ होती तर त्यापैकी २१,६८६ विद्यार्थीनी होत्या. यांची सरासरी ३६.०० होते.

२००७-२००८ मध्ये एकूण महाविद्यालयाची संख्या वाढून २८५ झाली संकुलमध्ये ९ ची भर पडली परिणामी विद्यार्थी संख्या ६५८६० झाली. त्यापैकी विद्यार्थीनीची संख्या २२२२५ होती. त्याचीं सरासरी ३३.७५ अशी होती.

२००८-२००९ मध्ये एकूण महाविद्यालयाची संख्या २८६ व संकुल ९ मध्ये एकूण विद्यार्थी संख्या ७९१९३ झाली व विद्यार्थीनी संख्या २६१९३ होती त्याची सरासरी ३३.७५ होती.

२००९-२०१० मध्ये महाविद्यालय व संकुलमध्ये एकूण विद्यार्थी संख्या ८९१९३ झाली. त्यापैकी विद्यार्थीनी संख्या ३६१९३ होते याची सरासरी ३५.००% होती.

एकूण संख्येची माहिती पाहता असे लक्षात येते की,या सहा वर्षात स्वा.रा.ती.म.वि. मध्ये एकूण विद्यार्थी संख्येमध्ये विद्यार्थीनींची संख्या ३३ ते ३६ टक्केच्या दरम्यान होती. हीच परिस्थिती वेगवेगळया जिल्ह्यात आढळून आली.

## विद्यापीठ व संलग्न जिल्हयातील विद्यार्थीनींची संख्या

## दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | इ.स. | विद्यापीठ एकूण | नांदेड एकूण | परभणी एकूण | लातूर एकूण | एकूण विद्यार्थीनी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००४-०५ | २२७/६४१ | ७५९३/२२५३७ | ४४१६/११५४६ | ५८३१/१७३१३ | १८०६७ | ३४.७५ |
| २ | २००५-०६ | २१८/६६१ | ८०२७/२५३१६ | ५३५९/१३८७७ | ७३१६/२१२७८ | २०९२०० | ३४.४० |
| ३ | २००६-०७ | २७०/७४१ | ८८९३/२६६१७ | ५७५१/१४२२५ | ७३११/२४२७७ | २१६८६ | ३६.०० |
| ४ | २००७-०८ | २७०/७४१ | ८८९३/२६६१७ | ५७५१/१४२२५ | ७३११/२४७७७ | २१६८६ | ३६.०० |
| ५ | २००८-०९ | २७३/७८९ | १००२७/३२०३९ | ५७१७/१६७९२ | १०१७६/२९५७३ | २६१९३ | ३३.७५ |
| ६ | २००९-१० | ३२२/८८० | १०२८७/३५४२६ | ६८१३/१८९२२ | १११७६/३०६६६ | ३८५९८ | ३६.०० |



वरील तक्त्यामध्ये जिल्हानिहाय विद्यार्थीनी संख्या दिलेली आहे. २००४-२००५ मध्ये विद्यापीठात ६४१ विद्यार्थ्यापैकी २२७ विद्यार्थीनी होत्या. नांदेड जिल्ह्यात २२५३७ विद्यार्थ्यापैकी विद्यार्थीनींची संख्या ७५९३ होती. परभणी जिल्ह्यात ११५४६ विद्यार्थी पैकी विद्यार्थीनी संख्या ४४१६ होती. लातूर जिल्हयात १७३१३ पैकी विद्यार्थीनी संख्या ५८३१ होती.

२००५-२००६ वर्षामध्ये विद्यापीठात विद्यार्थी संख्या ६६१ होती. त्यापैकी विद्यार्थीनी संख्या २१८ होती. नांदेड जिल्ह्यात २५३१६ विद्यार्थी संख्येपैकी ८०२७ विद्यार्थीनी होत्या. परभणी जिल्ह्यात १३८७७ विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थीनी संख्या ५३५९ होती. लातूर जिल्ह्याच्या महाविद्यालयात २४२७ विद्यार्थ्यांपैकी ७३११ विद्यार्थीनी होत्या.

इ.स.२००६-२००७ मध्ये विद्यापीठात ७४१ विद्यार्थ्यांपैकी २७० विद्यार्थीनी होत्या.नांदेड जिल्ह्यात २६०१७ विद्यार्थी संख्येपैकी ८८९३ विद्यार्थीनी होत्या. परभणी जिल्हयात १४२२५ विद्यार्थ्यांपैकी ५७५१ विद्यार्थीनी होत्या. तसेच लातूर जिल्ह्यात २४२७७ विद्यार्थ्यांपैकी ७३११ विद्यार्थीनी होत्या. हिच परिस्थिती २००७-२००८, २००८-२००९, २००९-१० वर्षी पाहण्यात आली एकूण पाहता. विद्यार्थीनींची संख्या सरासरी ३३ टक्के ते ३६ टक्के च्या दरम्यान दिसून आली.

## जनसंख्या :

वरील कोष्टकांच्या आधारावरून असे आढळून आले की, एकूण विद्यार्थीनी संख्या विद्यार्थी संख्येची ३६ टक्के आहे व शेवटच्या वर्षी म्हणजे २००९-२००१० स्वा.रा.ती.म.वि. मध्ये एकूण विद्यार्थीनी संख्या ३८५९८ च्या जवळपास होती. याचा अर्थ असा होतो की, संशोधनासाठी एकूण जनसंख्या ३८५९८ आहे. या जनसंख्येचा ९० टक्के पेक्षा जास्त न्यादर्श म्हणून ५०० विद्यार्थीनी Random sampling पध्दतीने निवडून त्यांना प्रश्नावली देण्यात आली व प्रतिसाद घेतले गेले त्याचप्रमाणे प्रश्नावलीच्या माध्यमातून ५०० पालकांची निवड करुन त्यांच्या क्रिडाविषयक प्रतिसाद घेण्यात आला.

## न्यादर्श :

५०० विद्यार्थीनी

५०० पालक

## कार्यपध्दत :

संशोधनासाठी अहवालाची अभिवृत्ती मापन कसोटीचा प्रश्नावलीत व मराठीत भाषांतर केला गेला व महाविद्यालयात जावून विद्यार्थीनी त्यांचे पालक शारीरिक प्रश्नावली देऊन त्यांचा प्रतिसाद घेतला. त्याच्या आधारावर कोष्टक तयार करु सांख्यिकीच्या आधारावर माहितीचे विश्लेषण करुन Mean व SD काढण्यात आली त्याच आधारावर अर्थनिर्वचन व निष्कर्ष काढण्यात आले.

## सांख्यिकी विश्लेषणासाठी निवडलेले तंत्र :

संशोधनात्मक अभ्यासात शास्त्रीय विश्लेषणाला विशेष महत्त्व असल्याने सांख्यिकीच्या वाढत्या ज्ञानाचा त्यात विशेष उपयोग करून घेण्यात आला आहे. संशोधनाची प्रक्रिया लक्षात घेतल्यास असे दिसते की, समस्येची निश्चिती झाल्यावर समस्येचे निराकरण करण्याची उपयुक्त अशा संभाव्य उत्तरातून अधिक समर्पक वाटणारे उत्तर परिकल्पना म्हणून निवडले असावे असे वाटत असते. परिकल्पनांच्या अनुरोधाने तो आपल्या संशोधनाचा अभिकल्प निवडतो. कोणता न्यादर्श घ्यावा, कोणत्या पध्दतीचा अवलंब करावा कोणत्या साधनाने कोणती माहिती गोळा करावी याची योजना संशोधक करत असतो. तद्नुसार माहिती संकलित करून व त्या पुराव्यांचे विश्लेषण करून तो आपल्या परिकल्पनेचे परीक्षण करतो व त्यावरुन परिकल्पनेचा त्याग करावयाचा की स्वीकार करावयाचा हे ठरवितो व ते त्यावरुन अभ्यासाचे निष्कर्ष काढता येतो.

प्रस्तुत संशोधनामध्ये सांख्यिकी विश्लेषणासाठी शेकडेवारी या तंत्राचा उपयोगी करून मध्यमान, मध्यांक, विचलन या तंत्राचा उपयोग केला आहे. कारण प्रस्तुत संशोधनामध्ये क्रीडाअधिव्याख्याता, प्राचार्य, पालक व विद्यार्थीनीच्या अभिवृत्ती बाबत शोध घेण्यासाठी त्यांची मते एखाद्या घटकाविषयी आजमवण्यासाठी जी माहिती गोळा केली आहे त्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी त्या घटकांच्या प्रतिसादकांची संख्या प्रति शंभरास काढलेले प्रमाण असल्यामुळे माहितीचा अर्थ सहज लक्षात येतो. म्हणून शेकडेवारी या सांख्यिकी तंत्राचा वापर केला आहे.

१) आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत सहभागी झालेले महिला संघ

| २००४-२००५ | खेळ | संघ |
|---|---|---|
| | व्हालिबॉल | ०७ संघ |
| | मलखांब | ०३ संघ |
| | टेबल टेनिस | ०७ संघ |
| | खो-खो | ०७ संघ |
| | बॅडमिटंन | ०४ संघ |
| | बास्केटबॉल | ०३ संघ |
| | कबड्डी | ०३ संघ |
| | क्रिकेट | ०४ संघ |
| | मैदानी स्पर्धा | १० संघ |
| | योगा | ०३ संघ |
| | पोहणे | ०४ संघ |
| २००५-२००६ | व्हालिबॉल | ०६ संघ |
| | मलखांब | ०४ संघ |
| | टेबल टेनिस | ०५ संघ |
| | खो-खो | ०८ संघ |
| | बॅडमिटंन | ०५ संघ |
| | बास्केटबॉल | ०६ संघ |
| | कबड्डी | १० संघ |
| | क्रिकेट | ०४ संघ |

| | | |
|---|---|---|
| | मैदानी स्पर्धा | ११ संघ |
| | योगा | ०४ संघ |
| | पोहणे | ०३ संघ |
| २००७-२००८ | व्हालिबॉल | ०५ संघ |
| | मलखांब | ०४ संघ |
| | टेबल टेनिस | ०७ संघ |
| | खो-खो | ०८ संघ |
| | बॅडमिटंन | ०५ संघ |
| | बास्केटबॉल | ०६ संघ |
| | कबड्डी | १० संघ |
| | क्रिकेट | ०६ संघ |
| | मैदानी स्पर्धा | १५ संघ |
| | योगा | ०४ संघ |
| | पोहणे | ०६ संघ |
| २००८-२००९ | व्हालिबॉल | ०७ संघ |
| | मलखांब | ०५ संघ |
| | टेबल टेनिस | ०६ संघ |
| | खो-खो | १० संघ |
| | बॅडमिटंन | ०६ संघ |
| | बास्केटबॉल | ०३ संघ |
| | कबड्डी | १२ संघ |

| | | |
|---|---|---|
| | क्रिकेट | ०५ संघ |
| | मैदानी स्पर्धा | १५ संघ |
| | योगा | ०३ संघ |
| | पोहणे | ०६ संघ |
| २००९-१० | व्हालिबॉल | ०९ संघ |
| | मलखांब | ०४ संघ |
| | टेबल टेनिस | ०६ संघ |
| | खो-खो | ११ संघ |
| | बॅडमिटंन | ०५ संघ |
| | बास्केटबॉल | ०४ संघ |
| | कबड्डी | १५ संघ |
| | क्रिकेट | ०४ संघ |
| | मैदानी स्पर्धा | १६ संघ |
| | योगा | ०४ संघ |
| | पोहणे | ०६ संघ |

याचबरोबर अंतर विद्यापीठासाठी पाठवण्यात आलेल्या विद्यार्थीनी संघाची तपशील पुढीलप्रमाणे आहे. विद्यापीठात खेळ विभाग स्वतंत्र आहे. दरवर्षी अंतर महाविद्यालयतीन सामने आयोजित करण्यात येतात. या सामन्यातुन होतकरु व चागले खेळाडू निवडून त्यांचा संघ तयार करुन अंतर विद्यापीठ सामन्याकरिता पाठवण्यात येतो.

विद्यापीठाप्रमाणेच प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र क्रिडा विभाग व क्रिडा अधिव्याख्याताची स्वतंत्र पदभार सोपविलेला आहे. एखादा खेळाडूचा संघ क्वचित काही समस्येमुळे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होउ शकला नाही. परंतु एखादा खेळाडू उत्कृष्ठ असेल तर त्याची निवड चाचणी म्हणून स्पर्धा घेतली जाते. व त्यातून सांघीक स्पर्धेत ही आंतरमहाविद्यापीठीय खेळात त्याचा समावेश होउ शकतो या सर्व

बाबी लक्षात घेवून मुलींच्या क्रिडा स्पर्धेबाबत बाहेरगावी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणा-या मर्यादा पालकांची माणसिकता सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक, आर्थिक घटकांचा होणारा परिणाम या सर्व बाबीमुळे मुलींच्या क्रिडा क्षेत्रातील भवितव्याचा विचार व त्यासाठी घ्यावयास काळजीच्या संदर्भात मागील काही वर्षाचा आंतरविद्यापीठीय महिला खेळाडूंचा सहभाग यावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक ठरेल. यासाठी २००५ ते २०१० पर्यंतची आकडेवारी व खेळाच्या संघाच्या सहभागाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## २. आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत सहभागी झालेले महिला संघ

| बॅडमिटंन | | |
|---|---|---|
| वर्षे | खेळाडूंची संख्या | स्थळ |
| २००४ | ०४ | बरकततुल्ला विद्यापीठ, भोपाळ |
| २००५ | ०४ | जिवाजी विद्यापीठ, ग्वालीयर |
| २००६ | ०४ | मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| २००७ | ०४ | मुंबई |
| २००८ | ०४ | गुजरात |
| २००९ | ०४ | आर.डी. विद्यापीठ जबलपुर |
| २०१० | ०४ | व्हि.एन.एस. विद्यापीठ गुजरात |
| क्रिकेट | | |
| २००४ | १६ | अलगप्पा विद्यापीठ, तामीळनाडू |
| २००५ | १६ | युनिव्हरसिटी ऑफ कलकत्ता |
| २००६ | १६ | जिवाजी विद्यापीठ, ग्वालीयर |
| २००७ | १६ | ग्वालीयर |
| २००८ | १६ | अलगप्पा विद्यापीठ, तामीळनाडू |
| २००९ | १५ | युनिव्हरसिटी ऑफ कलकत्ता |
| २०१० | १५ | |

| टेबल टेनिस | | |
|---|---|---|
| २००४ | ०५ | पुणे विद्यापीठ, पुणे |
| २००५ | ०५ | गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद |
| २००६ | ०३ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| २००७ | ०५ | अहमदाबाद |
| २००८ | ०५ | जी.एन.डी. विद्यापीठ, अमृतसर |
| २००९ | ०५ | भारतीयार विद्यापीठ, पुणे |
| २०१० | ०५ | डॉ. एच.एस. गौर विद्यापीठ, सागर (एम.पी.) |
| **व्हॉलिबॉल** | | |
| २००४ | ११ | विद्यापीठ कालीकत |
| २००५ | १२ | मंगलोर विद्यापीठ, मंगलोर |
| २००६ | १२ | महात्मा गांधी विद्यापीठ, कोटयाम |
| २००७ | १२ | एम.जी विद्यापीठ, कोटयाम |
| २००८ | १२ | कन्नूर विद्यापीठ, कन्नूर |
| २००९ | १२ | नॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव |
| २०१० | १२ | एल.एन.यु.पी. विद्यापीठ, ग्वाल्हेर |
| **बॉस्केटबॉल** | | |
| २००४ | ०८ | बरकततुल्ला विद्यापीठ, भोपाळ |
| २००५ | ०८ | बनस्थळी विद्यापीठ, बनस्थळी, राजस्थान |
| २००६ | ०७ | व्यंकटेश्वरा विद्यापीठ, तिरुपती |
| २००७ | ०८ | एम.जी विद्यापीठ, कोटयाम |
| २००८ | ०८ | महात्मा गांधी विद्यापीठ, कोटयाम |
| २००९ | ०८ | अमरावती विद्यापीठ, अमरावती |
| २०१० | ०८ | एम.डी. विद्यापीठ, अजमेर |

| कबड्डी | | |
|---|---|---|
| २००४ | १२ | एम.एस. विद्यापीठ, पल्यामकोटी |
| २००५ | १२ | बेंगलूर विद्यापीठ, बेंगलूर |
| २००६ | १२ | नागार्जुन विद्यापीठ, गुंटूर |
| २००७ | १२ | मदुराई |
| २००८ | १२ | तिरुपती |
| २००९ | ११ | मुंबई |
| २०१० | १२ | विक्रम विद्यापीठ, उजैन |
| मैदानी स्पर्धा | | |
| २००४ | १० | नागार्जून विद्यापीठ, गुंटूर |
| २००५ | ०७ | एम.एस. विद्यापीठ, पल्यामकोटी |
| २००६ | ०७ | बेंगलूर विद्यापीठ, बेंगलूर |
| २००७ | ०६ | अन्नमलाई विद्यापीठ, चैन्नई |
| २००८ | १३ | एम.जी विद्यापीठ, कोटयाम |
| २००९ | ०९ | युनिव्हरसिटी ऑफ मदुराई |
| २०१० | १२ | ए.एन. विद्यापीठ, गुंटुर |
| खो-खो | | |
| २००४ | १२ | बनस्थळी विद्यापीठ, राजस्थान |
| २००५ | १२ | भारतीयर विद्यापीठ, कोयमतूर |
| २००६ | १२ | युनिव्हरसिटी ऑफ कालीकत |
| २००७ | १२ | सुंदरनर युनिव्हरसिटी, तिरुलेविली |
| २००८ | १२ | संत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर |
| २००९ | १२ | अन्नमलाई विद्यापीठ, मद्रास |
| २०१० | १२ | आंध्रा विद्यापीठ, विशाखापटनम |

| | | |
|---|---|---|
| **मलखांब** | | |
| २००४ | ०४ | वरंगल |
| २००५ | ०४ | गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर |
| २००६ | ०५ | कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र |
| २००७ | ०४ | पंजाब विद्यापीठ, पतीयाला |
| २००८ | ०५ | कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र |
| २००९ | ०५ | एल.एन.पी.ई. विद्यापीठ, ग्वाल्हेर |
| २०१० | ०५ | |
| **योगा** | | |
| २००४ | ०८ | गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर |
| २००५ | ०६ | एम.एस. विद्यापीठ, उदयपूर |
| २००६ | -- | -- |
| २००७ | -- | -- |
| २००८ | -- | -- |
| २००९ | -- | -- |
| २०१० | -- | -- |
| **पोहणे** | | |
| २००४ | ०४ | व्ही.टी. विद्यापीठ, बेळगाम |
| २००५ | ०३ | केरळा |
| २००६ | ०३ | पंजाब विद्यापीठ, चंदीगड |
| २००७ | ०३ | केरळ |
| २००८ | ०२ | मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| २००९ | ०५ | गुरुदेव विद्यापीठ, अमृतसर |
| २०१० | ०४ | कलकत्ता |


उपरोक्त आकडेवारीनुसार असे लक्षात येते की, ज्या क्रीडाप्रकाराची राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा होतात त्या क्रीडाप्रकारास खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. तसेच ग्रामीण भागात पूर्व परंपरेने चालत आलेल्या व शाळेतून खेळल्या जाणा-या कबड्डी आणि खो-खो या स्पर्धेसही प्रतिसाद मिळालेला आहे. व्हॉलिबॉल, क्रीकेट, टेबल टेनिस, मैदानी स्पर्धा इ. क्रीडा प्रकारात महिला खेळाडूंचा सहभाग आहे. तर योगा, जिमनॅस्टिक, नेमबाजी, बॉक्सींग, लॉन टेनिस, हॉकी, फूटबॉल, हॅडबॉल आदि क्रीडा प्रकारात उदासिनता असल्याची दिसून येते. वरील सहभाग असला तरी तो अल्पशा मानावा लागेल. विदेशी क्रीडाप्रकार क्रीकेट, बॅटमेटन या क्रीडा प्रकारास ही महिला खेळांडूंचा प्रतिसाद कमीच आहे.

३. विद्यार्थीनी, पालक,क्रीडा शिक्षक व प्राचार्य यांच्या क्रीडा अभिवृत्तीचा आलेख

## तक्ता क्र.१

## विद्यार्थीनींमध्ये खेळाविषयी आवड दाखवणारा तक्ता

| पूर्ण सहमत | | अंशत: सहमत | | अनिश्चित | | अंशत: असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| २२३ | ४४.६ | १६५ | ३३.० | ०८४ | १६.८ | ०२० | ४.० | ००८ | १.६ | ५०० | १०० |





आपल्याला खेळाविषयी आवड आहे ह्या विधानाच्या प्रतिसादात ५०० पैकी २२३ (४४.६०%) विद्यार्थीनींनी पूर्ण सहमत असा प्रतिसाद दिला आणि १६५ (३३%) विद्यार्थीनींनी अंशत: सहमत असा प्रतिसाद दिला. ८४ (१६.८०%) विद्यार्थिनींचा विचार काही निश्चित नाही तर २० (४%) विद्यार्थीनी ह्या विधानाशी अंशत: असहमत आहेत तर ८ (१.६०%) विद्यार्थीनी पूर्णपणे असहमत आहेत. यावरुन असे आढळून येते की ५०० पैकी ३८८ म्हणजे ७७.६०% विद्यार्थीनीना खेळाची आवड आहे व संधी मिळाल्यावर ते खेळात भाग घेण्यामध्ये मागे राहणार नाहीत.

## तक्ता क्र.३

## महाविद्यालयातील क्रीडांगणा विषयी माहिती देणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतःअसहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ०९५ | १९.०० | ०८५ | १७.०० | ०९४ | १८.८० | १११ | २२.२० | ११५ | २३.०० | ५०० | १०० |





महाविद्यालयात क्रिडांगण उपलब्ध आहे. या विधानाच्या उत्तरासाठी ५०० पैकी ९५ (१९%) विद्यार्थीनींचे मत आहे की क्रीडांगण उपलब्ध आहे. ८५ (१७%) विद्यार्थीनी या विधानाशी अंशतः सहमत आहेत. ९४ (१८.८%) विद्यार्थीनी या विधानाविषयी काही सांगू शकत नाही. १११ (२२.२%) विद्यार्थीनींचे म्हणणे आहे की, त्यांच्या महाविद्यालयात क्रीडांगण आवश्यकतेनुसार उपलब्ध नाही. तर ११५ (२३%) विद्यार्थीनींच्या उत्तराप्रमाणे त्यांच्या महाविद्यालयात क्रीडांगण उपलब्ध नाही. याचा अर्थ असा होतो की ५०० पैकी २२६ (४५.२०%) विद्यार्थीनींच्या मताप्रमाणे महाविद्यालयात आवश्यकतेनुसार क्रीडांगण नाही म्हणजे क्रिडांगणाची सुविधा नसल्यामुळे इच्छा असूनही विद्यार्थीनी खेळात भाग घेऊ शकत नाहीत.

# तक्ता क्र.४

## महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेच्या आयोजनाबाबत माहिती देणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतःअसहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १५२ | ३०.४० | १५९ | ३१.८० | १४९ | २९.८० | ०२२ | ४.४० | ०१८ | ३.६० | ५०० | १०० |





आपल्या महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते ह्या विधानाचा प्रतिसाद म्हणून ५०० पैकी १५२ (३०.४०%) विद्यार्थीनींनी पूर्ण सहमत असा प्रतिसाद दिला आहे. १५९ (३१.८०%) विद्यार्थीनींनी अंशः सहमत असा प्रतिसाद दिला, १४९ (२९.८०%) विद्यार्थीनींनी काही उत्तर दिले नाही तर, २२ (४.४०%) विद्यार्थीनींनी अंशतः सहमत प्रतिसाद दिला आहे. १८(३.६०%) विद्यार्थीनींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या महाविद्यालयात कधीच क्रीडास्पर्धा झाल्या नाहीत असे उत्तर दिले. याचा अर्थ असा होतो की, फक्त काही निवडक महाविद्यालयातच क्रीडास्पर्धांचे आयोजन केले जाते. सर्व महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेचे आयोजन केले जात नाही.

## तक्ता क्र. १०

## क्रीडाअधिव्याख्याता प्रोत्साहनाबाबत माहिती देणारा तक्ता.

## विभाग - अ

| पूर्ण सहमत | | अंशतःसहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १९६ | ३९.२० | १८८ | ३७.६० | ०७७ | १५.४० | ०२४ | ४.८० | ०१५ | ३.०० | ५०० | १०० |





क्रीडाशिक्षक मुलींना खेळात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देतात या विधानाविषयी ५०० पैकी १९६ (३९.२%) विद्यार्थीनींनी पूर्ण सहमत असा प्रतिसाद दिला आणि १८८ (३७.६%) विद्यार्थीनींनी अंशतः सहमत असा प्रतिसाद दिला. ७७ (१५.४०%) विद्यार्थीनींनी काही प्रतिसाद दिला नाही तर २४ (४.८%) विद्यार्थीनींनी अंशतः असहमती दाखविली तर १५ (३%) विद्यार्थीनींनी असे सांगितले की, त्यांना क्रीडाशिक्षक मुळीच प्रोत्साहन देत नाहीत असे सांगितले. म्हणजे ५०० पैकी ३८४ (७६.८०%) विद्यार्थीनींच्या मते त्यांना क्रीडाशिक्षक खेळाविषयी प्रोत्साहन देतात याचे कारण कदाचित असे असू शकते की, खेळ व क्रीडा त्यांची जबाबदारी असल्यामुळे ते प्रोत्साहन देत असतात व मुलींना क्रीडास्पर्धेमध्ये सहभागी करत असतील.

## तक्ता क्र. ११

## क्रीडाविभाग व साहित्याविषयी माहिती देणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ३०७ | ६१.४० | १९० | ३८.०० | ००३ | ०.६० | ००० | ०.०० | ००० | ०.०० | ५०० | १०० |





महाविद्यालयात स्वतंत्र क्रीडाविभाग आहे व खेळासाठी साहित्य पुरविले जाते या विधानाला ५०० पैकी ३०७ (६१%) विद्यार्थीनी पूर्ण सहमत आहेत, १९० (३८.००%) विद्यार्थीनींनी अंशतः सहमत असा प्रतिसाद दिला फक्त ३ (०.६०%) विद्यार्थीनींनी उत्तर दिले नाही व एकही विद्यार्थीनीने नकारात्मक उत्तर दिले नाही. म्हणजे ५०० विद्यार्थीनी पैकी ४९७ (९९.४०%) विद्यार्थीनींच्या मते महाविद्यालयात स्वतंत्र क्रीडाविभाग आहे व खेळासाठी साहित्य पुरविले जाते. पण, मुलींना प्रोत्साहन नसल्यामुळे व काही कारणामुळे विद्यार्थीनींना संधी दिली जात नाही. म्हणून त्या खेळांच्या स्पर्धेत भाग घेऊ शकत नाहीत.

# तक्ता क्र. १२

## महिला क्रीडाशिक्षकांविषयी माहिती देणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ११९ | २३.८० | २०२ | ४०.४० | १०९ | २१.८० | ०५१ | १०.२० | ०१९ | ३.८० | ५०० | १०० |





खेळासाठी महिला क्रीडा शिक्षक असावे असे आपणास वाटते या विधानाला ५०० पैकी ११९ (२३.८०%) विद्यार्थीनींनी पूर्ण सहमत असा प्रतिसाद दिला आणि २०२ (३०.४०%) विद्यार्थीनी अंशतः सहमत असा प्रतिसाद दिला. तर, १०९ (२१.८०%) विद्यार्थीनींनी काहीच उत्तर दिले नाही व १९ (३.८%) विद्यार्थीनींनी नकारात्मक प्रतिसाद दिला. म्हणजे ५०० पैकी ३२१ (६४.२०%) विद्यार्थीनींना असे वाटते की, महाविद्यालयात जर महिला क्रीडा शिक्षक असेल तर विद्यार्थीनींना खेळात सहभागी होण्याची संधी व प्रोत्साहन मिळेल.

# तक्ता क्र. १३

## क्रीडांगणावरील क्रीडाशिक्षकांची उपस्थिती दर्शविणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १०८ | २१.६० | १०२ | २०.४० | २८० | ५६.०० | ००७ | १.४० | ००३ | ०.६० | ५०० | १०० |





क्रीडांगणावर क्रीडाशिक्षक नियमित उपस्थित राहतात. या विधानाला ५०० पैकी १०८ (२१.६०%) विद्यार्थीनी पूर्ण सहमत आहेत. तर, १०२ (२०.४०%) विद्यार्थीनी अंशतः सहमत आहेत. २८० (५६.००%) विद्यार्थीनींनी या विधानाला प्रतिसाद देण्याचे टाळले तर ३ (०.६०%) विद्यार्थीनीने या विधानाचा नकारात्मक प्रतिसाद दिला म्हणजे ५०० पैकी २८० (५६.००%) विद्यार्थीनींच्या मताप्रमाणे क्रीडा शिक्षक नेहमी क्रीडांगणावर उपस्थित राहतात.

# तक्ता क्र. १४

## सरावासाठी मार्गदर्शक व कोच विषयी माहिती देणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ११० | २२.०० | १०८ | २१.६० | २३५ | ४७.०० | ०२९ | ५.८० | ०१८ | ३.६० | ५०० | १०० |





मुलींना खेळाच्या सरावासाठी मार्गदर्शक कोच उपलब्ध असावे या विधानाला ५०० पैकी ११० (२२.००%) विद्यार्थीनी पूर्ण सहमत आहेत तर १०८ (२१.६०%) विद्यार्थीनीने अंशतः सहमती दर्शविली आहे. २३५ (४७.००%) विद्यार्थीनीचे या विषयी काहीच म्हणणे नाही तर २९ (५.८०%) या विधानाशी अंशतः असहमत आहेत व १८ (३.६०%) विद्यार्थीनी पूर्ण असहमत आहेत. म्हणजे ५०० पैकी २३५ (४७.००%) विद्यार्थीनीना मार्गदर्शक व कोचची आवश्यकता आहे. म्हणजे जर विद्यार्थीनींना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन मिळाले व वेळोवेळी येणाऱ्या समस्यांच्या समाधानासाठी जर कोच व मार्गदर्शक उपलब्ध असेल तर विद्यार्थीनींच्या खेळाचा दर्जा उंचावू शकतो व त्यांना प्रोत्साहन मिळू शकते व ते खेळात सहभागी होऊ शकतात.

# तक्ता क्र. १६

## आहाराविषयी माहिती देणारा तक्ता

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ००२ | ०.४० | ००२ | ०.४० | ००३ | ०.६० | २४५ | ४९.०० | २४८ | ४९.६० | ५०० | १०० |





महाविद्यालयातून आपणास सरावानंतर आहार दिला जातो या मुद्याविषयी ५०० पैकी ३ (०.८०%) विद्यार्थीनींनी कबूल केले की, त्यांना खेळाच्या सरावानंतर आहार दिला जातो. बाकीच्या संपूर्ण विद्यार्थीनींनी असा प्रतिसाद दिला की, महाविद्यालयातून सरावानंतर आहार देण्याची पध्दत नाही. म्हणजे महाविद्यालयातून खेळाच्या सरावानंतर महिला खेळाडूंना आहार दिला जात नाही. निश्चितपणे त्यांचा त्यांच्या खेळाच्या स्तरावर परिणाम होतो.

## तक्ता क्र. २१

## क्रीडा सरावासाठी सहकाराविषयी माहिती दर्शविणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १०५ | २१.०० | १०२ | २०.४० | १०० | २०.०० | ०९९ | १९.८० | ०९४ | १८.८० | ५०० | १०० |





महाविद्यालयातून खेळाच्या सरावासाठी सहकार्य मिळते का? ह्या प्रश्नाचा प्रतिसाद म्हणून ५०० पैकी १०५ (२१%) विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले जाते असा प्रतिसाद दिला. १०२ (२०.४०%) विद्यार्थीनींनी कोच आहे असा प्रतिसाद दिला. १०० (२०.००%) विद्यार्थीनींनी क्रीडासाहित्य उपलब्ध केले जाते असे सांगितले. तर ९९ (१९.८%) विद्यार्थीनी पोषाख पुरवला जातो असा प्रतिसाद नोंदविला व ९४ (१८.८%) विद्यार्थीनींनी असे सांगितले की सरावाच्या वेळी त्यांना आहार दिला जातो.

## तक्ता क्र. २२

## खेळात मुलींचा सहभाग वाढविण्याच्या आवश्यकतेविषयी माहिती दर्शविणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १८९ | ३७.८० | १७१ | ३४.२० | ०९९ | १९.८० | ०२९ | ५.८० | ०१२ | २.०४ | ५०० | १०० |





मुलींचा खेळात सहभाग वाढविण्यासाठी काय आवश्यक आहे? या विधानाचे प्रतिसाद म्हणून ५०० पैकी १८९ (३७.८०%) विद्यार्थीनींनी प्रोत्साहन हे उत्तर दिले. १७१ (३४.२०%) विद्यार्थीनींनी पालकांचे सहकार्य हे उत्तर दिले. तर, ९९ (१९.८%) विद्यार्थीनींनी सांगितले की, यासाठी खेळाविषयक अभिवृत्तीची फार गरज असते. २९ (५.८%) विद्यार्थीनी म्हणतात की, खेळाच्या कौशल्याला जास्त महत्त्व आहे. तर १२ (२.४%) विद्यार्थीनी साहित्य पुरविणे याला महत्त्व दिला आहे.

## तक्ता क्र. १

### खेळाविषयी आवड दाखवणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ३७८ | ७५.६० | १२० | २४.०० | ००२ | ०.४० | ००० | ०.० | ००० | ०.० | ५०० | १०० |





आपणास खेळाविषयी आवड आहे. या विधानाला प्रतिसाद म्हणून ५०० पालकांपैकी ३७८ (७५.६०%) पालकांनी पूर्ण सहमत असा प्रतिसाद दिला आणि १२० (२४%) पालकांनी अंशतः सहमत असा प्रतिसाद दिला. २ (०.४०%) पालकांनी काहीच उत्तर दिले नाही. नकारात्मक प्रतिसाद कोणीच दिलेला नाही. याचा अर्थ असा होतो की, सर्व पालकांना खेळाविषयी आवड आहे.

## तक्ता क्र. २

## क्रीडास्पर्धेत सहभागाविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ०२० | ४.०० | ०१८ | ३.६० | ०३२ | ६.४० | २११ | ४२.२० | २१९ | ४३.८० | ५०० | १०० |





आपण क्रीडास्पर्धेत आंतरमहाविद्यालय, आंतरविद्यापीठ, राज्य, देश व इतर पातळीवर खेळामध्ये भाग घेतला आहे का? या प्रश्नाच्या प्रतिसादात ५०० पैकी २० (४%) पालकांनी आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत भाग घेतला, असा प्रतिसाद दिला तर १८ (३.६०%) पालकांनी आंतरविद्यापीठ स्पर्धेत भाग घेतला होता असे सांगितले. ३२ (६.४%) पालकांनी शहरी क्रीडास्पर्धेत भाग घेतला होता तर २१९ (४३.८%) पालकांनी खाजगी क्रीडास्पर्धेत भाग घेतलेला होता. असा प्रतिसाद दिला. याचा अर्थ असा होतो की, पालकांना खेळाविषयी माहिती आहे. त्यांना खेळाची आवड आहे व ते स्वतः खेळात भाग घेत होते. याचा अर्थ असा होतो की, त्यांना खेळाची आवड आहे.

# तक्ता क्र. ३

## मुलींच्या खेळाविषयी आवडीची माहिती

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| २८० | ५६.०० | २१४ | ४२.८० | ००२ | ०.४० | ००३ | ०.६० | ००१ | ०.२० | ५०० | १०० |





आपल्या मुलीस खेळाविषयी आवड आहे याविषयी माहिती मिळविताना असे आढळून आले की, ५०० पैकी २८० (५६%) पालकांच्या मुलींना खेळाची आवड आहे. असा प्रतिसाद त्यांनी नोंदविला तर २१४ (४२.८०%) पालकांनी काही प्रमाणात मुलींना खेळाची आवड आहे असे सांगितले. २ (०.४०%) पालकानी उत्तर देण्यास टाळले तर ३ (०.६०%) पालकांनी अंशतः असहमत असा प्रतिसाद दिला. याचा अर्थ असा होतो की, सरासरीपेक्षा जास्त पालकांच्या मुलींना खेळाविषयी आवड आहे असे दिसून आले.

## तक्ता क्र. ४

## अधिक यश मिळविण्यासाठी व प्रयत्नाविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १७१ | ३४.२० | १६१ | ३१.२० | ०९९ | १९.८० | ०३७ | ७.४० | ०३२ | ६.४० | ५०० | १०० |





आपल्या मुलीस खेळात आवड असल्यास त्यात अधिक भाग घेण्याकरिता प्रयत्न म्हणून आम्ही क्रीडाशिक्षकांची भेट घेतो असा प्रतिसाद ५०० पैकी १७१ (३४.२०%) पालकानी दिला तर १६१ (३१.२०%) पालकांनी असा प्रतिसाद दिला की ते प्राचार्यांना वेळोवेळी भेटतात. १९ (१९.८०%) पालकांनी सांगितले की, ते मुलींना खेळाविषयी प्रोत्साहन देतात. ३७ (७.४०%) मुलीच्या पालकांनी सांगितले की, ते स्वतः खेळात भाग घेतात तर ३२ (६.४०%) मुलींच्या पालकानी प्रोत्साहन किंवा सामग्री पुरविणे हि क्रिया करण्याविषयी माहिती दिली. याचा अर्थ असा होतो की, प्रत्येक पालक असे दाखवू इच्छितो की ते आपल्या मुलीच्या खेळात सहभागी होण्याविषयी उत्सुक आहेत व त्यांना ते नेहमी प्रोत्साहन देत असतात.

## तक्ता क्र. ५

## क्रीडाशिक्षक व क्रीडांगणाविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| २२३ | ४४.६० | २२१ | ४४.२० | ०५२ | १०.४० | ००२ | ०.४० | ००२ | ०.४० | ५०० | १०० |





आपली मुलगी ज्या महाविद्यालयात शिक्षण घेते त्या महाविद्यालयात क्रीडाशिक्षक व क्रीडांगण उपलब्ध आहे या विधानास प्रतिसाद म्हणून ५०० पैकी २२३ (४४.६%) पालकांनी पूर्ण सहमत असा प्रतिसाद दिला. ५२ (१०.४%) पालकानी उत्तर देण्याचे टाळले. २ (०.४%) पालकानी अंशतः असहमत असा प्रतिसाद दिला तर २ (०.४%) पालक पूर्णपणे असहमत आहेत याचा अर्थ असा होतो की, ५०० पैकी ४४४ (८८.८०%) पालकांच्या म्हणण्याप्रमाणे महाविद्यालयात क्रीडाशिक्षक व क्रीडांगण आहेत.

## तक्ता क्र. ६

### आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील पारितोषिकाविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ००० | ०.०० | ००० | ०.० | ००० | ०.० | १०१ | २०.२० | ३९९ | ७९.८० | ५०० | १०० |





आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत आपल्या मुलीनी कधीही पारितोषिक मिळविले नाही. असा प्रतिसाद ५०० (१००%) पालकानी दिला. याचा अर्थ असा होतो की, मुली खेळात भाग घेतात पण त्यांच्या खेळाचा स्तर इतका कमी आहे की, त्यांना पारितोषिके मिळालेली नाहीत.

# तक्ता क्र. ७

## क्रीडास्पर्धेत सहभागाविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ००० | ०.० | ००० | ०.० | ००० | ०.० | १२३ | २४.६० | ३७७ | ७५.४० | ५०० | १०० |





आपल्या मुलीने व्हॉलिबॉल, बॉस्केटबॉल, टेबल टेनिस, कब्बड्डी व खो-खो च्या स्पर्धेत भाग घेतला होता या विधानाला ५०० पालकापैकी एकही पालकाने होकारात्मक प्रतिसाद दिला नाही. व्हॉलिबॉल, बॉस्केटबॉल व टेबल टेनिस खेळाच्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थीनींची संख्या निरंक आहे. तर १२३ (२४.६०%) पालकांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या मुलींनी कब्बड्डी स्पर्धेत भाग घेतला होता व ३७७ (७५.४०%) मुलीनी खो-खो स्पर्धेत भाग घेतलेला दिसून आला. याचा अर्थ असा होतो की, मुली विदेशी खेळापेक्षा देशी खेळाकडे जास्त आकर्षित आहेत. बहुधा साहित्याच्या अभावामुळे ही परिस्थिती असेल असे वाटते.

## तक्ता क्र. ८

## क्रीडासुविधाच्या पाहणी बाबत माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ०२३ | ४.६० | ०१९ | ३.८० | ०९२ | १८.४० | १६८ | ३३.६० | १९८ | ३९.८० | ५०० | १०० |





मुलींच्या महाविद्यालयातील क्रीडासुविधाच्या पाहणी बाबतच्या विधानाच्या प्रतिसादास ५०० पालकांपैकी २३ (४.६०%) पालक पूर्ण सहमत आहेत तर १९ (३.८०%) पालक अंशतः सहमत आहेत. ९२ (१८.४०%) पालकांनी उत्तर देणे टाळले आहे. तर १८६ (३३.६०%) अंशतःअसहमत आहेत, तर १९८ (३९.८०%) पूर्ण असहमत आहेत. याचा अर्थ असा होतो की, ५०० पालकांपैकी ३३६ (७३.२०%) पालकांमध्ये मुलींच्या खेळाविषयी जशी जागरुकता पाहिजे तशी जागरुकता आढळून आलेली नाही.

# तक्ता क्र. ९

## खेळामुळे बदल दाखवणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| २३४ | ४६.८० | २२६ | ४५.२० | ०१९ | ३.८० | ००९ | १.८० | ०१२ | २.४० | ५०० | १०० |





आपली मुलगी खेळात सहभागी झाल्यामुळे तिच्यात लाजाळूवृत्ती व भीत्रेपणा नाहीसा झाला, धाडस व आत्मविश्वास वाढला, मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती वाढली, खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले का? या प्रश्नाच्या उत्तरास ५०० पैकी २३४ (४६.८०%) पालकांनी पूर्ण सहमती नोंदविली. २२६ (४५.२०%) पालकांनी सहमत असा प्रतिसाद दिला. १९ (३.८०%) पालकानी उत्तर दिले नाही तर २१ (४.२०%) पालकानी असहमत अशी प्रतिक्रिया दिली. म्हणजे ५०० पैकी ४६० (९२%) पालक असे आहेत की जे समजतात की खेळामुळे मुलींमध्ये बदल घडतात.

## तक्ता क्र. १०

## खेळामध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्याविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ००० | ०.० | ००० | ०.० | ००८ | १.६० | २३१ | ४६.२० | २६१ | ५२.२० | ५०० | १०० |





आपल्या मुलीने खेळाच्या क्षेत्रात देशाचे प्रतिनिधित्व करावे असे आपल्याला वाटते का? या विधानाचा प्रतिसाद म्हणून ५०० पैकी एकाही पालकाने होकारात्मक प्रतिसाद दिला नाही. याचा अर्थ असा होतो की, सुविधाच्या अभावी, सामाजिक बांधिलकी व समस्यामुळे मुलींनी खेळात भाग घेणे कठीण होते. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून अशी अपेक्षा करणे चूकीचे आहे असा त्यांचा प्रतिसाद होता.

## तक्ता क्र. ११

## शासनाच्या धोरणा विषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशत: सहमत | | अनिश्चित | | अंशत: असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १९३ | ३८.६० | १९० | ३८.०० | १०५ | २१.०० | ००८ | १.६० | ००४ | ०.८० | ५०० | १०० |





ग्रामीण भागात शासनाने क्रीडाशिष्यवृत्ती, गावात क्रीडांगण, साहित्य पुरविणे स्पर्धेचे आयोजन करणे व प्रसिध्दी व बजेट मंजूर करणे ही धोरणे गरजेची आहेत. या विधानाला ५०० पालकांपैकी १९३ (३८.६%) पालकांनी शासनाने विद्यार्थीनीना शिष्यवृत्ती द्यावी असा प्रतिसाद दिला. १९० (३८%) पालकांचे असे म्हणणे आहे की, प्रत्येक गावात मुलींच्या खेळासाठी क्रीडांगणे उपलब्ध करुन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. तर १०५ (२१%) पालकांचे म्हणणे आहे की, शासनाने खेळाचे साहित्य पुरविले पाहिजे. ८ (१.६%) पालक म्हणतात की, स्पर्धेचे आयोजन शासनाने स्वत: केले पाहिजे व त्याचप्रमाणे ४ (०.८%) पालक म्हणतात की शासनाने बजेट दिले पाहिजे. जर वरील धोरणाची शासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी केली तर, निश्चितपणे विद्यार्थीनी खेळात सहभागी होतील.

## तक्ता क्र. १२

## महिला खेळाडूंच्या राखीव जागेच्या प्रश्नासंबंधी

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १४० | २८.०० | १३४ | २६.८ | ०९८ | १९.६० | ०६९ | १३.८० | ०५९ | ११.८० | ५०० | १०० |





मुलींच्या खेळाला प्राधान्य देण्यासाठी नोकरीमध्ये राखीव जागा ठेवणे आवश्यक आहे. ह्या विधानाला ५०० पालकांपैकी १४० (२८%) पालकांनी पूर्ण सहमती दर्शविली. तर १३४ (२६.८०%) पालकांनी अंशतः सहमत म्हणून प्रतिसाद दिला. ९८ (१९.६०%) पालकांनी उत्तर दिले नाही तर ६९ (१३.८०%) पालकांनी अंशतः असहमत व ५९ (११.८०%) पालकांनी पूर्णपणे असहमत असा प्रतिसाद दिला. याचा अर्थ असा होतो की, ५०० पालकापैकी २७४ (५४.८०%) पालकांच्या मताप्रमाणे जर मुलींना खेळात प्राविण्य दाखविल्यामुळे जर नोकरीत राखीव जागा देण्यात आली तर त्यांना प्रोत्साहन मिळेल ते खेळात भाग घेतील व मुलींच्या खेळाचा दर्जा वाढेल.

## तक्ता क्र. १३

## क्रीडास्पर्धेमध्ये यशासाठी आवश्यक गोष्टी.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| २२९ | ४५.८० | २०२ | ४०.४० | ०५६ | ११.२० | ०१० | २.० | ००३ | ०.६० | ५०० | १०० |





आपल्या मुर्लीना क्रीडास्पर्धेत अधिक यश मिळविण्यासाठी, आर्थिक मदत, चिकाटी, जिद्द. सराव, वशिलेबाजीची आवश्यकता असते. ह्या विधानाला ५०० पालकांपैकी २२९ (४५.८%) पालकांनी आर्थिक मदत, २०२ (४०.४०%) पालकांनी चिकाटी, जिद्द तर ५६ (११.२०%) पालकांनी सराव व १० (२%) पालकांनी वशिलेबाजी व ३ (०.६०%) पालकांनी मार्गदर्शन आवश्यक आहे. असा प्रतिसाद दिला. याचा अर्थ असा होतो की, ५०० पैकी ४३१ (८६.२०%) पालकांच्या म्हणण्यानुसार जर मुलीना आर्थिक मदत मिळाली व त्यांच्यात वरील गुण व सुविधा असल्या तर ते खेळात भाग घेऊ शकतात.

## तक्ता क्र. १४

## मुलींच्या अपयशाबद्दल प्रतिक्रिया.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ००० | ०.० | ००० | ०.० | ००१ | ०.२० | १६६ | ३३.२० | ३३३ | ६६.६० | ५०० | १०० |





आपण आपल्या मुलींच्या खेळात अपयशाबद्दल नाराज आहात. या विधानाला ५०० पैकी एकाही पालकांने सहमती दाखविली नाही. पूर्ण ५०० पालकांनी या विधानाला नकारात्मक प्रतिसाद दिला. याचा अर्थ असा होतो की, मुलींच्या खेळामध्ये यश किंवा अपयशाचा पालकांवर काहीही परिणाम होत नाही व त्यांना याची काळजी नाही म्हणजे पालक मुलींच्या खेळात भाग घेणे किंवा न घेणे याला महत्त्व देत नाहीत.

## तक्ता क्र. १५

## नातेवाईकांचे मत दाखविणारा तक्ता.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| २६९ | ५३.८० | १७१ | ३४.२० | ०३१ | ६.२० | ०१९ | ३.८० | ०१० | २.०० | ५०० | १०० |





आपल्या नातेवाईकांचे मुलींच्या खेळाविषयी कोणते मत आहे? या प्रश्नाला ५०० पैकी २६९ (५३.८०%) पालकांच्या म्हणण्याप्रमाणे नातेवाईकांचे मत नकारात्मक आहे. १७१ (३४.२०%) नातेवाईकांचे मत सर्वसाधारण आहे. ३१ (६.२०%) पालकांचे नातेवाईक कशीही प्रतिक्रिया देत नाहीत. तर १९ (३.८०%) नातेवाईकांचे मत असाधारण वाटते व फक्त १० (२%) नातेवाईकांची प्रतिक्रिया सकारात्मक आहे. याचा अर्थ असा होतो की, ५०० पैकी ४४० (६८%) नातेवाईकाना असे वाटते की मुलींनी खेळाच्या स्पर्धेत सहभागी होऊ नये.

## तक्ता क्र. १६

## गावात मुलींसाठी क्रीडांगणाविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशत: सहमत | | अनिश्चित | | अंशत: असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ००० | ०.० | ००४ | ०.८० | ०६० | १२.०० | १९९ | ३९.८० | २३७ | ४७.४० | ५०० | १०० |





आपल्या शहरात व गावात मुलींसाठी वेगळे क्रीडांगण उपलब्ध आहे. या विधानाला ५०० पालकांपैकी एकानेही होकारात्मक उत्तर दिले नाही. याचा अर्थ असा होतो की, कुठेही मुलींना खेळण्यासाठी वेगळी व्यवस्था केलेली नाही व मुली लाजाळूवृत्तीमुळे मुलांसमोर खेळण्यास नकार देतात. त्यांचे कौशल्य आपल्या समोर येत नाही यामुळे त्यांना खेळाची संधी मिळत नाही. ते खेळात सहभागी होत नाहीत.

## तक्ता क्र. १७

## खेळाडू मुलींच्या समाजातील प्रतिमाविषयी माहिती.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ००२ | ०.४० | ००२ | ०.४० | ००६ | १.२० | २०१ | ४०.२० | २८९ | ५७.८० | ५०० | १०० |





खेळातील मुलींच्या सहभागामुळे समाजात प्रतिमा उंचावते. या विधानाला ५०० पैकी एकही पालकाने सहमती दाखविली नाही. याचा अर्थ असा होतो की, पालक मुलींच्या खेळात सहभागी होण्याविषयी विरोध करतात. समाजात मुलींना समान स्थान दिले जात नाही. अंधश्रध्दा व जुन्या चालीरिती अजून सुध्दा समाजात प्रचलित आहेत. यामुळे मुलींच्या खेळांच्या स्पर्धेवर निश्चितपणे परिणाम होतो व त्या खेळात सहभागी होऊ इच्छित नाही.

## तक्ता क्र. १८

## खेळकर वृत्तीला प्रोत्साहन.

| पूर्ण सहमत | | अंशतः सहमत | | अनिश्चित | | अंशतः असहमत | | पूर्ण असहमत | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| ०२२ | ४.४० | ०२५ | ५.० | ०८५ | १७.० | १६९ | ३३.८० | १९९ | ३९.८० | ५०० | १०० |




पालक म्हणून मुलीच्या खेळकर वृत्तीला प्रोत्साहन देता या विधानाला ५०० पालकांपैकी २२ (४.४%) पालकांनी पूर्ण सहमत असा प्रतिसाद दिला. २५ (५.०%) पालकांनी अंशतः सहमत असा प्रतिसाद दिला. ८५ (१७%) पालकांनी उत्तर दिले नाही तर, १६९ (३३.८%) पालकांनी अंशतः असहमत तर १९९ (३९.८%) पालक पूर्ण असहमत आहेत म्हणजे ५०० पैकी ३६८ (७३.६%) पालक मुलींच्या खेळकर वृत्तीला प्राधान्य देत नाहीत, यामुळे मुली खेळात सहभागी होत नाहीत व क्रीडास्पर्धेत सहभागी होत नाहीत.

## अल्प सहभागाची कारणे :

मराठवाडा विभागामध्ये महिलांच्या अल्प क्रीडासहभागाची कारणे कोणती आहेत. याचा या अभ्यासात शोध घ्यावयाचा आहे. हे अध्ययन सामाजिक पाहणीवर आधारलेले आहे. त्यापूर्वी या प्रश्नाबाबत विविध संशोधकांनी मांडलेली मते लक्षात घेतली पाहिजेत. विशेष करुन मराठवाडयातील शिक्षणाचा अभ्यास करताना श्री.ब.गोगटे यांनी सखोल व सर्वसमावेशक चिंतन केले आहे. त्यांच्या अभ्यासाचा आढावा घेतला असता त्यातून प्रकटणारे काही पैलू हे विशेष महत्त्वाचे ठरतात.

श्री.ब.गोगटे यांच्या मते, ''मराठवाडयात महिलांच्या शिक्षणात पुढील अडथळे येतात.''

१. **पूर्वग्रह :** मराठवाडयातील पालकवर्ग हा मोगलाई परपंरेत असल्यामूळे मुलींना खेळातील सहभागासाठी स्वातंत्र्य दिले जात नाही. [२३]

२. **बालविवाह,** हुंडा, पडदा यासारख्या जुन्या सामाजिक चालीरिती[२४] या प्रकारच्या जुनाट रुढी मराठवाडयात ग्रामीण भागात आजही दिसून येतात. याबाबत प्रतिभा वैशंपायन यांनी म्हटले आहे, ''मराठवाडयात ९० वर्षापूर्वी महिला शिक्षणाची परवड भयावह होती. पालकाचे दुर्लक्ष, आर्थिक अडचणी आणि इच्छाशक्तीचा अभाव ही प्रमुख कारणे त्यामागे होती.''[२५] तत्कालीन मराठवाडयात सरंजामशाही मनोवृत्ती होती, त्याचे चित्रण करताना वैशंपायन म्हणतात, ''मुस्लिम स्त्रियांना गोषाच असे. त्या घराबाहेरही पडत नसत. पण हिंदू स्त्रियांसुध्दा सहसा घराबाहेर पडत नसत.''[२६] हया परिस्थितीत शिक्षणामुळे हळूहळू फरक पडत आहे. परंतु मानसिकता बदलण्यास बराच अवधी लागतो.

३. **पालकांची वाईट आर्थिक परिस्थिती :** मराठवाडयात ग्रामीण भागात सामाजिक व आर्थिक विषमता आहे. या विषमतेमुळे मराठवाडयातील पालकवर्ग मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष देऊ शकत नाही.[२७]

४. **स्त्री शिक्षिकांचा अभाव :** मराठवाडा विभागात पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे स्वतंत्र महिला शिक्षिका नाहीत. असल्या तरी त्यांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे शाळा व महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींचे प्रमाणही कमी आहे.[२८]

५. **स्त्रियांना संरक्षण मिळेल अशा वसतिगृहांचा अभाव :** मराठवाडयात औरंगाबाद, जालना, नांदेड, लातूर ही शहरे वगळता स्वतंत्र मुलींच्या वसतिगृहाची सोय नाही. त्यामुळे मुलींना संरक्षण मिळत नाही. त्यांचा शिक्षणातील आत्मविश्वास वाढत नाही.[२९]

६. **स्त्रीसाठी स्वतंत्र शिक्षण संस्थाचा अभाव :** मराठवाडयात ८ महिला महाविद्यालय आहेत. त्यामुळे शिक्षण व क्रीडा शिक्षणात महिलांचा पुरेसा सहभाग नाही. या सर्व घटकांचा विचार करता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात महिला क्रीडा विकासाच्य मार्गामध्ये किती प्रकारच्या अडचणी येतात ते लक्षात येऊ शकते. मराठवाडा प्रदेशातील शिक्षणांची शास्त्रीय चिकित्सा करताना डॉ. सुधा काळदाते म्हणतात, उच्च शिक्षणाचा अपवाद वगळता मराठवाडयात क्रीडा शिक्षणाचा फारसा विकास झालेला नाही. महाविद्यालय व माध्यमिक स्तरावरसुध्दा शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाची उपेक्षा होते.[३०] डॉ. सुधा काळदाते यांनी या पार्श्वभूमीवर केलेली मीमांसा अर्थपूर्ण आहे. त्यांनी समाजशास्त्रीय मीमांसा करताना म्हटले आहे, "महाविद्यालय व विद्यापीठामध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आहेत. त्यासाठी शिक्षक असून काही निधीही असतो. पण हे विभाग प्रभावी नाही. त्यातून उच्च दर्जाचे क्रीडापटू तयार होत नाहीत. "[३१]

## ५. ठळक निष्कर्ष :

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील क्रीडा स्पर्धेत मुलींचा सहभाग हा अल्प स्वरुपाचा आहे. व त्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. या अल्प सहभागामध्ये अनेक कारणे आहेत त्यामध्ये गरिबी, दारिद्र्य साधनसामुग्रीचा अभाव, अज्ञान, गैरसमज, अंधश्रध्दा अशा प्रकारची कारणे असल्याचे स्पष्ट होते. या कारणांचा पाहणीव्दारे शोध घेवून त्या आधारे केलेले विश्लेषण हे स्पष्ट करते की, क्रीडा सहभागाच्या अभिवृत्तीसाठी या सर्व कारणावर यथायोग्य उपाय योजिले पाहिजेत.

२) महाविद्यालयामध्ये मुलींच्या क्रीडा सहभागासाठी पोषक क्रीडा सुविधांचा अभाव आहे. महाविद्यालयामध्ये देशी व विदेशी असे दोनही प्रकारचे खेळ खेळले जातात. देशी खेळापेक्षाही विदेशी खेळासाठी पोषक व अत्याधुनिक क्रीडा सुविधांची गरज असते. त्यामध्ये क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, टेबलटेनिस, रेसतंत्र, सॉप्टबॉल, बॉस्केटबॉल या खेळासाठी लागणारे प्रगत साहित्य हे ग्रामीण महाविद्यालयांना उपलब्ध नाही. त्यामुळे महिला खेळाडू मागे राहतात. मागास भागात

अशा अद्यावत व प्रगत सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर त्या आधारे प्रगतीच्या नव्या वाटा शोधता येऊ शकतील.

३) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कबड्डी, खो-खो तसेच व्हॉलिबॉल, टेबल टेनिस, बास्केट बॉल तसेच मैदानी स्पर्धेत प्रामुख्याने भाग घेतात. सध्याच्या अल्पसहभागाचे चित्र बदलण्यासाठी ठोस उपाय योजले पाहिजेत. या पलीकडे जाऊन नवे क्रीडा प्रकार पुढे आले पाहिजेत. प्रशिक्षण सुविधा पुरविल्या पाहिजेत. तसेच मुलींना क्रीडा सहभागासाठी पोषक वातावरण तयार केले पाहिजेत. संस्थाचालक, पालकांचा सहभाग या प्रश्नावर सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. त्यामुळे देशी व विदेशी खेळामध्ये मुलींच्या सहभाग वृध्दीसाठी पोषक वातावरण निर्मितीवर अधिक प्रमाणात भर देण्याची गरज आहे.

४) क्रीडा स्पर्धेतील वर्तमान सहभाग सामाजिक जागृतीमुळे हळूहळू वाढत आहे. त्यास अधिक गती दिली पाहिजे. महिलांच्या अल्प क्रीडा सहभागाची कारणे त्यामागे अज्ञान व अंधश्रध्दा हे घटक प्रामुख्याने जाणवतात. या घटकांवर मात करण्यासाठी प्रथम व्यापक सामाजिक प्रबोधनाची गरज आहे. महिला क्रीडा जागृती सप्ताह साजरा करुन शिबीरे, कार्यशाळा आणि अभ्यास वर्गाचे आयोजन करुन या बाबतीत प्रभावशाली उपाययोजना करण्यावर भर दिला पाहिजे. समाज प्रबोधन व जाणीवजागृती या मार्गाने मुलींचा क्रीडा सहभाग अधिक गतीने वाढू शकेल, यात शंका नाही.

५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मुली कबड्डी, खो-खो या देशी खेळात अधिक भागात घेतात. तर क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन या विदेशी खेळास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही. विदेशी खेळामध्ये लागणारी साधने, प्रशिक्षण सुविधा आणि अभ्यासाची सोय याचा विचार करता विदेशी खेळांची अधिक उपेक्षा होते. क्रीडा शिक्षक वा प्रशिक्षक हे मुलींकडे दुय्यम दृष्टीने पाहतात. त्यामुळे मुलींच्या क्रीडा सहभागाची उपेक्षा होते. भावी काळात या सर्व प्रश्नांवर विचार करून मुलींना आनंद देणा-या क्रीडा प्रकारात त्यांचा वाटा अधिक वाढला पाहिजे व त्यासाठी पुरेशा सुविधांचा विस्तार केला पाहिजे.

६) मुलींचे खेळाकडे पाहण्याची अंतर्दृष्टी हळूहळू सकारात्मक होत आहे. प्रसारमाध्यमे तसेच सभोवतीचे सांस्कृतिक वातावरण यामुळे हा बदल घडत आहे. शहरी भागामध्ये घडत असलेले हे

परिवर्तनाचे लोण ग्रामीण भागामध्ये कसे पोहचेल याचा विचार करून, अधिक चांगल्या बदलासाठी यथायोग्य उपाय योजिले पाहिजेत. शैक्षणिक संस्थेमध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा विकासावर अधिक भर देण्याची गरज आहे. आपल्या संस्थापक यंत्रणेत बदल करून नव्या वातावरणाचा लाभ घेण्यावर भर दिला पाहिजे. तरच भावी काळात नवे आशादायी चित्र उदयास येऊ शकेल.

७) ग्रामीण भागात पालकांच्या मागस व जुनाट मनोवृत्तीमध्ये मुलींच्या खेळातील सहभागासाठी प्रोत्साहन मिळत नाही. सामाजिक बंधने व रुढी यावर मात करून सुशिक्षित पालक हळूहळू नवीन दृष्टीने खेळांच्या सहभागासाठी प्रोत्साहन देत आहेत. पालकांची जुनाट व मागास मनोवृत्ती हे अल्प क्रीडा सहभागातील प्रमुख कारण होय. त्यामुळे या प्रश्नावर पालकांच्या प्रबोधनावर भर देण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने पालकसभेचे आयोजन करुन पालकांना मार्गदर्शन केले पाहिजे. पालकांच्या दृष्टिकोनातून बदल झाला तरच नवे सहस्त्रक याबाबत काही नवं घडवू शकेल.

## ६. शिफारशी -

१) प्रतिकुल वातावरणात बदल करण्यासाठी प्रथम सामाजिक परिस्थिती सुधारावी.

२) महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर महिलांसाठी स्वतंत्र स्पर्धाचे आयोजन करावे. त्यामुळे मुलींचे प्रमाण वाढू शकेल.

३) पालकांचा नकारात्मक दृष्टिकोन बदलावा म्हणून पालकांठी कार्यशाळेचे आयोजन करावे.

## ७. उपाययोजना :

आंतरमहाविद्यालयीन व आंतरविद्यापीठीय क्रीडास्पर्धेमध्ये मुलींचा सहभाग वाढविण्यासाठी उत्तरदात्यांनी पुढील उपाय सूचित केले आहेत.

१) प्रतिकुल वातावरणात बदल करण्यासाठी प्रथम सामाजिक परिस्थिती सुधारावी.

२) महाविद्यालय व विद्यापीठीय स्तरावर मुर्लीसाठी स्वतंत्र स्पर्धेचे आयोजन करावे त्यामुळे मुलींचे प्रमाण वाढू शकेल.

३) शिक्षकांनी मुलींना खेळांच्या स्पर्धाची योग्य माहिती द्यावी. उत्तम दर्जाचे प्रशिक्षण द्यावे व क्रीडासामुग्रीही उपलब्ध करुन द्यावी.

४) मुलींना खेळातील नैपुण्याच्या आधारे विशेष शिष्यवृत्ती द्यावी व त्यांना पारंगत करण्यासाठी स्वतंत्र महिला प्रशिक्षक नेमावेत.

५) अमेरिका, जपान, चीन, भारतामध्ये महिलांना समसमान संधी देऊन खेळात सूवर्णपदक प्राप्त करण्यासाठी योग्य वातावरण तयार करावे.

६) शालेय व महाविद्यालयीन स्तरावर मुलींचा प्रत्येक क्रीडा प्रकारातील सहभाग सक्तीचा करावा.

७) महिला खेळाडूबाबत भारतीय समाजात पोषक वातावरण तयार करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत त्यासाठी राज्य व केंद्र सरकारच्या क्रीडा धोरणात बदल करुन योग्य मोहिमा आखण्यात याव्यात.

## ८. नवे प्रमेय :

या प्रबंधामध्ये आंतरविद्यापीठीय व आंतरमहाविद्यालयीन क्रीडा सहभागाची मीमांसा करण्यात आली. सभोवतीचे सामाजिक व सांस्कृतिक वातावरण बदलल्या शिवाय मुलींचा क्रीडा सहभाग वाढू शकेल असे वाटत नाही. ही बाब अनेक कारणांचा परिपाक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सामाजिक घटक महत्त्वाचे ठरतात. या परिस्थितीत विविध सामाजिक घटकांचा अभ्यास करुन पालकांची उदासिनता दूर करणे महत्त्वाचे आहे. तसेच शिक्षकांचा दृष्टिकोन सकारात्मक असेल तर, त्यांना प्रगत सामाजिक मूल्यांची जाणीव असेल तर मुलींचा खेळाचा सहभाग निश्चितपणे वाढू शकतो.

महाविद्यालयीन स्तरावर मुलींच्या सहभागांची कारणमीमांसा करता असे दिसते की, त्यामध्ये, सामाजिक, आर्थिक, मानसिक हे घटक जसे महत्त्वाचे आहेत त्याचप्रमाणे पालकांची अभिवृत्ती सुध्दा तेवढीच महत्त्वाची आहे. पालकांचे दृष्टिकोन बदलण्यासाठी यथायोग्य प्रशिक्षणाची गरज आहे. व असे प्रशिक्षण देताना पालकांचे प्रबोधन झाले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने दरवर्षी पालकसभेचे आयोजन करुन त्यामध्ये काही रचनात्मक बदल सूचित केले पाहिजेत. या संशोधनातून पुढे येणारे प्रमेय असे आहेत.

१) मुलीचा सहभाग ही एक समाजशास्त्रीय प्रक्रिया आहे. जर सभोवतीचे सामाजिक वातावरण बदलले नाही तर अल्पक्रीडा सहभाग सुधारण्याची प्रक्रिया अवघड आहे.

२) मुलींच्या क्रीडा सहभागासाठी योग्य नियम तयार केले पाहिजेत व त्यांची काटेकोर अंमलबजावणी केली पाहिजे.

३) भावी काळात प्रतिभाशाली मुलींच्या क्रीडा विकासासाठी अधिकतम प्रयत्नांची गरज आहे. त्यासाठी विशेष प्रशिक्षण मोहिम आखली पाहिजेत.

४) मुलींच्या क्रीडा सहभागामुळे सामाजिक आरोग्य सुधारते त्यामुळे सहभाग वृधीसाठी शिष्यवृत्ती व पुरस्कार योजना आखल्या पाहिजेत.

५) मुलींच्या मनातील भयगंड दूर करून पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक केला पाहिजेत. त्यासाठी पालकांच्या प्रबोधनाची गरज आहे.

या अभ्यासाचे प्रमेय हे सांगते की, मराठवाडयासारख्या मागास भागात पालकांच्या जाणीव जागृत्तीची गरज आहे. तसेच मुलींचा अल्पक्रीडा सहभाग जर वाढावयाचा असेल तर प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र समिती स्थापन केली पाहिजे. आणि या समीमितीमध्ये संस्थाचालक, पालक, शिक्षक आणि विद्यार्थीनी यांचे प्रतिनिधी असले पाहिजेत या समितीच्या वतीने दरवर्षी किमान ३ वेळा प्रबोधन वर्गाचे आयोजन केले पाहिजे. व त्यातून नवा दृष्टिकोन तयार केला पाहिजे. तसेच झाले तर आजचे निराशाजनक चित्र बदलून पुढील १० वर्षांनी क्रीडा सहभागाबाबत नवे आशादायी चित्र उदयास येवू शकते.

—

**समारोप -**

हा शोधनिबंध विद्यार्थीनीच्या अल्पसहभागाची कारणमिमांसा करणारा असला तरी सामाजिक संशोधनाचा एक महत्वाचा भाग आहे. प्रामुख्याने मराठवाडयातील शिक्षण व शारिरीक शिक्षण या बाबतची चित्रे स्पष्ट करण्यात आलेली आहेत. त्यांच्या महत्वाच्या पैलूवर प्रश्नावलीच्या माध्यमातून उत्तरे मिळून आलेखांच्या व्दारे त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. भावी दूर दृष्टिकोन व मुल्याकंन दृष्टिकोनातून स्पष्टीकरण करण्यत आलेले आहे.

तसेच अन्वेशनात्मक पध्दतीचा आराखडा स्पष्ट करुन समाजशास्त्रीय दृष्टिको मांडण्यात अलेला आहे. गृहिते व तथ्य संकलनाच्या पध्दतीतील प्रश्नावली या पध्दतीचा वापर करुन त्यांचे महत्व स्पष्टीकरण केलेले आहे. संशोधनास पूरक अशी माहिती संकलीत करुन विद्यार्थीनीच्या प्रतिसादाची आकडेवारी आलेखाच्या माध्यमातून स्पष्ट करण्या आलेली आहे. पालकाच्या वृत्ती व प्रवृत्तीचा आलेख ही स्पष्टीकरणात दिलेला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्षेत्रातील मुलींची क्रीडा सहभागाची मीमांसा करता असे दिसते की, त्यांचा नकारात्मक दृष्टिकोन बदलून तो सकारात्मक होत आहे व त्यांच्या सहभागाचे प्रमाण हळूहळू वाढत आहे.

२. पालकांची मानसिकता बदलली तर, मुलींचा क्रीडा सहभाग अधिक वाढू शकेल. त्यासाठी त्यांच्यावर अधिक प्रमाणत संस्कार व प्रबोधन करण्याची गरज आहे.

३. भौतिक संरचनाचा अभाव, खेळासाठी मैदानाची कमतरता तसेच शिक्षक व प्राध्यापकांचे यथार्थ दिशा दर्शन यापेक्षाही सभोवतीचे सामाजिक व सांस्कृतिक वातावरण अधिक पोषक बनण्याची गरज आहे.

अशा प्रकारे यथायोग्य बदल झाले तर नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर या चार जिल्हयातील महाविद्यालये व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थीनींचा क्रीडा सहभाग अधिकाधिक गतीने वाढू शकेल. त्यासाठी या प्रबंधातील निष्कर्ष हे निश्चितच या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पूरक ठरु शकतील.

अशा प्रकारे या प्रबंधात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मुलींच्या क्रीडा सहभागाचा अभ्यास करण्यात आला. या प्रश्नावर येथे करण्यात आलेले संशोधन हे व्यवहारिक स्वरुपाचे आहे.

मुलींमध्ये जागृतीची लोण वाढत आहे. पालक वर्ग हे सतर्क होत आहे मागासलेपाची अंधश्रध्दा व रुढीप्रिय मनोवृत्ती जशी कमी होत आहे. तशी पालकांची दृष्टी ही बदलत आहे.

## पुढील संशोधनासाठी विषय -

१) मैदानी खेळात मुलींच्या अल्पसहभागाची कारणे शोधणे.

२) परदेशी खेळात मुलींच्या अल्पसहभागाची कारणे शोधणे.

३) नवीन पर्वात मुलीकडून अपेक्षांचा अभ्यास करणे.

४) पालकांची अभिवृत्ती बदलण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

५) शिक्षकांची मुलीविषयी अभिवृत्ती बदलण्यासाठी उपाययोजना करणे.

६) मुलींना खेळाची सामुग्री पुरविण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

७) मुलं व मुली एखाद्या खेळात सहभागी होण्यास उपाययोजना सूचविणे.

८) महाराष्ट्रात खेळामध्ये मुलींच्या अल्पसहभागाची कारणे शोधणे.

९) भारतात खेळामध्ये मुलींच्या अल्पसहभागाची कारणे शोधणे.

# १. विद्यार्थीनींची प्रश्नावली

"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत विद्यार्थीनींचा सहभाग विद्यार्थीनी, पालक, शिक्षक व प्राचार्य यांच्या अभिवृत्तीचा : एक चिकित्सक अभ्यास"

विद्यार्थीनीचे नाव - ------------------------------------------

वर्ग - ------------------------------------------

तुकडी - ------------------------------------------

महाविद्यालयाचे नाव - ------------------------------------------

वय - ------------------------------------------

राहण्याचे ठिकाण - शहरी / ग्रामीण

## विद्यार्थीनींसाठी प्रश्नावली

| अ. क्र. | विधान | पूर्णपणे सहमत | अंशतः सहमत | अनिश्चित | अंशतः असहमत | पूर्णपणे असहमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आपल्याला खेळाविषयी आवड आहे. | | | | | |
| २ | अपल्याला क्रीडा स्पर्धा आवडतात<br>१) व्हॉलिबॉल २) खो-खो, कबड्डी ३) बॉस्केटबाल ४) ॲथेलेटिक्स | | | | | |
| ३ | आपल्या महाविद्यालयात खेळासाठी क्रीडांगण उपलब्ध आहे | | | | | |
| ४ | आपल्या महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते | | | | | |
| ५ | आपली निवड आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत झाली होती | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | आपण किती वेळा आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला होता<br>१) एक वेळा २) दोन वेळा ३) तीन वेळा<br>४) नाही | | | | | |
| ७ | महाविद्यालयात मुलींसाठी क्रीडा स्पर्धेतील सहभागाविषयी विशेष प्रयत्न केले जातात. | | | | | |
| ८ | आपल्या महाविद्यालयात मुलीसाठी खेळण्यास वातावरण अनुकूल आहे. | | | | | |
| ९ | आपल्या महाविद्यालयात खेळण्यासाठी विशेष उत्तेजन दिले जाते | | | | | |
| १० | क्रीडा शिक्षक मुलींना खेळात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देतात. | | | | | |
| ११ | महाविद्यालयात स्वतंत्र क्रीडा विभाग आहे काय? असेल तर खेळासाठी साहित्य पुरविले जाते. | | | | | |
| १२ | खेळासाठी महिला क्रीडा शिक्षक असावे असे आपणाला वाटते | | | | | |
| १३ | क्रीडांगणावर क्रीडा शिक्षक नियमित उपस्थित असावा | | | | | |
| १४ | मुलींना खेळाच्या सरावासाठी मार्गदर्शक कोच उपलब्ध असावेक असे वाटते | | | | | |
| १५ | आपल्या महाविद्यालयात मुलींसाठी कोणत्या खेळाचे आयोजन केले<br>१) व्हॉलिबॉल २) खो-खो, कबड्डी ३) बास्केटबॉल<br>४) ॲथॅलिटिक्स | | | | | |
| १६ | महाविद्यालयातून आपणास सरावानंतर आहार दिला जातो. | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | आपल्या महाविद्यालयातील मुली कोणकोणत्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात<br>१)व्हॉलिबॉल २) खो-खो, कबड्डी ३) बास्केटबॉल<br>४)ॲथॅलिटिक्स | | | | | |
| १८ | आपण आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविले आहे.<br>१)व्हॉलिबॉल २) खो-खो, कबड्डी ३) बास्केटबॉल<br>४)ॲथॅलिटिक्स | | | | | |
| १९ | क्रीडा घडामोडी संदर्भात आपल्या ग्रंथालयाची नियतकालिके विद्यार्थीनीसाठी उपलब्ध आहेत. | | | | | |
| २० | आपल्या महाविद्यालयातून मुलींना अश्वमेध, आंतरमहाविद्यालयीन व आंतरविद्यापीठीय स्पर्धेला पाठवतात. | | | | | |
| २१ | महाविद्यालयातून खेळाच्या सरावासाठी सहकार्य मिळते<br>१) क्रीडा साहित्य २) पोषक ३) आहार | — | | | | |
| २२ | मुलींचा खेळात सहभाग वाढविण्यासाठी आपल्या मते काय आवश्यक आहे.<br>१) क्रीडा शिक्षकांचे प्रोत्साहन<br>२) पालकांचे सहकार्य<br>३) खेळासाठी पोषक वातावरण | | | | | |
| २३ | क्रीडा विषयक माहिती केंद्र रेडिओ टी.व्ही. दुरध्वनी इ. सुविधा उपलब्ध आहेत. | | | | | |
| २४ | खेळात सहभाग घेतलास आपला महाविद्यालयीन व समाजातन सन्मान होतो. | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २५ | खेळामध्ये महिला प्रशिक्षकांचा अभाव हे मुलींच्या क्रिडास्पर्धेत अल्पसहभागाचे कारण वाटते. | | | | | |
| २६ | खेळाडूसाठी शासनाने मदत करावे असे वाटते | | | | | |
| २७ | मुलींच्या आंतरमहाविद्यालयीन सहभाग क्रीडा स्पर्धेविषयी आपले मत | | | | | |

आपली विश्वासू

## २. पालकांची प्रश्नावली

"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धेत विद्यार्थीनींचा सहभाग विद्यार्थीनी, पालक, शिक्षक व प्राचार्य यांच्या अभिवृत्तीचा : एक चिकित्सक अभ्यास"

नाव - ------------------------------------------------

पत्ता -

राहण्याचे ठिकाण - शहरी / ग्रामीण

पालकांसाठी प्रश्नावली

| अ. क्र. | विधान | पूर्णपणे सहमत | अंशतः सहमत | अनिश्चित | अंशतः असहमत | पूर्णपणे असहमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आपणास खेळाविषयी आवड आहे. | | | | | |
| २ | आपण क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला होता.<br>१) आंतरमहाविद्यालयीन २) आंतर विद्यापीठ ३)राज्य ४)नाही | | | | | |
| ३ | आपल्या मुलीस खेळाविषयी आवड आहे. | | | | | |
| ४ | मुलीस खेळात आवड असल्यास त्यात अधिक यश मिळविण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केलेत ?<br>१) प्राचार्याची भेट घेवून माहिती दिली.<br>२) क्रीडा शिक्षकाला मुलींच्या खेळाविषयी संपर्क साधला<br>३) स्वतः क्रीडा / खेळांच्या स्पर्धेत भाग घ्यावयास लावून प्रोत्साहन दिले. | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | आपली मुलगी ज्या महाविद्यालयात शिक्षण घेते त्या महाविद्यालयात क्रीडा शिक्षक व क्रीडांगण उपलब्ध आहे. | | | | | |
| ६ | आपली मुलगी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत पारितोषिक विजेती आहे | | | | | |
| ७ | आपल्या मुलीने क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला<br>१) व्हॉलिबॉल २) खो-खो, कबड्डी ३) बॉस्केटबॉल ४)ॲथॅलॅटिक्स | | | | | |
| ८ | मुलींच्या महाविद्यालयातील क्रीडा सुविधा बाबत पाहणी केली आहे | | | | | |
| ९ | आपली मुलगी खेळात सहभागी झाल्यामुळे कोणते बदल झालेले आहेत.<br>१) लाजाळूपणा व भित्रेपणा नाहीसा झाला.<br>२) धाडस व आत्मविश्वास वाढला<br>३) मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती वाढली<br>४) खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले | | | | | |
| १० | आपली मुलगी क्रीडा स्पर्धेत देशाचे प्रतिनिधीत्व करावे असे आपणास वाटते | | | | | |
| ११ | ग्रामीण भागात खेळासाठी शासनाने कोणते धोरण आत्मसात आणणे गरजेचे आहे<br>१) क्रीडा शिष्यवृत्ती २) गाव तेथे क्रीडांगण व प्रशिक्षण ३) क्रीडा स्पर्धेचे आयोजन व प्रसिध्दी<br>४) आवश्यतेवरील सर्व | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | मुलींच्या खेळाला प्राधान्य देण्यासाठी नोकरीमध्ये राखीव जागा ठेवणे आवश्यक आहे. | | | | | |
| १३ | आपली मुलगी क्रीडास्पर्धेत अधिक यश मिळविण्यासाठी काय आवश्यक आहे? १) आर्थिक मदत २) चिकटी, जिद्द व सराव ३) वशिलेबाजी ४) आळस | | | | | |
| १४ | आपण आपल्या मुलींच्या क्रीडास्पर्धेतील अपयशामुळे नाराज आहात | | | | | |
| १५ | आपल्या नातेवाईकांचे मुलींच्या खेळाविषयी मत कोणते आहे? १) नकारात्मक २) सकारात्मक ३) सर्वसाधारण ४) असाधारण | | | | | |
| १६ | आपल्या गावात/शहरात क्रीडांगण आहे काय? असल्यास क्रीडांगण मालकीचे आहे | | | | | |
| १७ | खेळातील मुलींच्या सहभागामुळे समाजात प्रतिमा उंचावते | | | | | |
| १८ | पालक म्हणून मुलींच्या खेळकर वृत्तीला प्रोत्साहन देता | | | | | |
| १९ | आपल्या मते मुलींच्या खेळातील सहभाग वाढविण्यासाठी व दर्जेदार खेळाडून निर्मितीसाठी काय करता येवू शकते | | | | | |

पालकांची स्वाक्षरी

# संदर्भग्रंथ सूची

## पुस्तके


१) वाखारकर दि.गो. - महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षणाची वाटचाल मराठवाडा सांस्कृतिक मंडळ, १९७३, औरंगाबाद.

२) आगचेकर वि.आ. - शिक्षण संपदा. निळकंठ प्रकाशन १९८९, सातारा.

३) गाजरे प.मा. - शिक्षण-प्रशिक्षण, मिनल प्रकाशन १९८९, सांगली.

४) डॉ. पारसनीस व.रा. - शिक्षकाचे प्रशिक्षण, नुतन प्रकाशन १९९९, पुणे.

५) डॉ. शर्मा वि.मा. - शारीरिक शिक्षण तत्वे-व्यवस्था, गजानन प्रकाशन, १९८६, अमरावती.

६) डॉ. देसाई द.दे. - शारीरिक शिक्षण मार्गदर्शिका आशा प्रकाशन, १९९१, नागपूर.

७) डॉ. भागवत एस.पी. - शारीरिक शिक्षणची तत्त्वे, प्रकाशन ब्रदर्स प्रकाशन, १९९२, अमरावती.

८) सनेर वा. रा. - शिक्षण तत्त्व, सुयोग प्रकाशन, १९९०, अमरावती.

९) डॉ. मोहन वि.वि. - शारीरिक शिक्षा, सिध्दांत एवं तत्वज्ञान मेट्रोपोलीयन, १९७९, दिल्ली.

१०) डॉ. मोरे स.ना. - योग दिपीका, नुतन प्रकाशन १९९०, पुणे.

११) शर्मा बी.डी. - शारीरिक एवं स्वास्थ्य शिक्षा आशा प्रकाशन गृह, नई दिल्ली, १९९१.

१२) डॉ. मदन कमलेश - शारीरिक शिक्षा की सैध्दान्तिकी मेट्रोपोलयन, नई दिल्ली, १९९१.

१३) कोटीवाले द.ब. - शारीरिक शिक्षणाचा विकास, ठोकळ प्रकाशन, पुणे - १, १९६६.

१४) डॉ. भावे वि.ना. - शरीर विज्ञान, अ.वि.गृह प्रकाशन, पुणे-१, १९६१.

२८) विरकर गंद्रे सामंत - प्रायोगिक शैक्षणिक मानसशास्त्र, ठोकळ प्रकाशन, पुणे-२, दुसरी आवृत्ती १९६९.

२९) राय पारसनाथ - अनुसंधान परिचयः लक्ष्मीनारायण अग्रवाल, आग्रा १९९१.

३०) शर्मा आर.ए. - शिक्षा अनुसंधानः आर.लाल. बुक डेपो, मेरठ - १९९३.

३१) शर्मा आर.ए. - शोध-प्रबंध लेखानः इंटरनॅशनल पब्लीशींग हाऊस, मेरठ-१९९३.

३२) तिवारी गोविंद - शैक्षणिक एवं मनोवैज्ञानिक अनुसंधान के मुलागारः विनोद पुस्तक मंदिर, आग्रा १९८५.

३३) अस्थाना बिपीन - मनोविज्ञान शोध विधियाँः विनोद पुस्तक मंदिर, आग्रा-१९७७.

३४) मुळे / उमाटे - शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे / महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर - १९९७.

३५) पारसनीस न.रा. - शिक्षकाचे प्रशिक्षणः नुतन प्रकाशन, पुणे-१९९३.

३६) आलेगावकर प.न. - क्रीडा मानसशास्त्रः रघुवंशी प्रकाशन, पुणे-१९८९.

३७) मुखर्जी रत्न - क्रीडा मनोविज्ञानः विनोद पुस्तक मंदिर, आग्रा १९९०

३८) कमलेश एम.एल. - मेट्रो पोलीयनः दिल्ली-१९९४.

३९) गाजरे रा.वि. - शालेय व्यवस्थापनः नुतन प्रकाशन, पुणे-१९९०

४०) पाण्डेय लक्ष्मीकांत - शारीरिक शिक्षा एवं संघटन प्रकाशनः मेट्रोपोलियनः दिल्ली १९८५

४१) कविश्वर डी.पी. - शारीरिक शिक्षा की पध्दतीयांः एस.एम. नागपूर-१९९३.

४२) करमरकर ए.के. - क्रीडा अधिशिक्षा पध्दतीः शक्ती प्रकाशन, अमरावती १९८३.

१५) डॉ. तिवारी उदय भानु - शारीरिक शिक्षा सिध्दांत, एवं व्यवहार राज्यस्थान प्रकाशन, जयपुर-२, १९७७.

१६) गोगटे भास्कर रामकृष्ण - शारीरिक शिक्षण विकास व नियोजन अ.म.शा.शि. मंडळ प्रकाशन, पुणे-२, १९५५

१७) डॉ. खैर गजानन श्री. - शारीरिक शिक्षणाची मुलतत्त्वे, अ.म.शा.शि. मंडळ प्रकाशन, पुणे-२, १९५६

१८) Sandu Gurbaksh S. - Psychology in Sports Friends Publications, Delhi-९, १९९२.

१९) डॉ. आलेगावकर प.म. - प्रगत क्रीडा मानसशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, १९९४.

२०) अकोलकर अ.वि. - सामाजिक मानसशास्त्र, कॅन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, १९९०

२१) भागवत एच.पी. - शरीर संपदा - मिनल प्रकाशन, कोल्हापूर, १९९०

२२) डॉ. अलेगावकर प.म. - क्रीडा मानसशास्त्र, रघुवंशी प्रकाशन, पुणे-३०, १९६५.

२३) डॉ. गोगटे वि.वि. - सामाजिक मानसशास्त्र कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, १९६५.

२४) गोरे म.मा. - शारीरिक शिक्षणाचा विकास, महाराष्ट्र शा.शि. मंडळ, प्रकाशन, पुणे-२, १९५६.

२५) डॉ. भांडारकर पु.ल. - सामाजिक संशोधन पध्दती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर-१, तिसरी आवृत्ती, १९८७.

२६) प्रा. केसरकर शेटे - शालेय संशोधन प्रकल्प, संपादक-शैक्षणिक कृति संशोधन म.रा. पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे-४.

२७) डॉ. उपासनी ना.के. - संपादक - शैक्षणिक कृति संशोधन म.रा. पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ पुणे-४.

४३) पाटील हिराजी - शारीरिक शिक्षणः तत्त्वे व व्यवस्थाः ठोकळ प्रकाशन, पुणे १९६८.

४४) गोगटे भास्कर रामकृष्ण - शारीरिक शिक्षणः तत्त्वे व स्वरुपः महाराष्ट्र शिक्षण मंडळ प्रकाशन, पुणे १९५५.

४५) गोगटे भास्कर रामकृष्ण - शारीरिक शिक्षणः विकास व नियोजनः महाराष्ट्र शिक्षण मंडळ प्रकाशन, पुणे १९५५.

४६) चोंबे एम. - शारीरिक शिक्षा के मुलाधार- कल्याणी पब्लीशर्स, लुधियाना-१९८६

४७) मोहन वि.वि. - शारीरिक शिक्षा, सिध्दांत एवं तत्त्वज्ञानः मेट्रोपोलियनः दिल्ली - १९७९

४८) व्यास शशी शेखर - शारीरिक शिक्षा, सिध्दांत एवं व्यवहारः राज्यस्थान प्रकाशन, जयपूर १९७७

४९) कमलेश आणि अवतार - शारीरिक शिक्षा के सिध्दांतः ए.पी. प्रकाशन, जलांदर १९९३.

५०) कमलेश मदन - शारीरिक शिक्षा की सैध्दांतीकीः मेट्रोपोलियनः दिल्ली १९९१.

५१) कमलेश एम.एल. - शारीरिक शिक्षा के सिध्दांत तथा इतिहास १९८७

५२) कमलेश मदन - शारीरिक शिक्षाः ऐतिहासिक वाङ्मय, मेट्रोपोलीयनः दिल्ली १९९३.

५३) पांण्डे लक्ष्मीकांत - शारीरिक शिक्षा कि शिक्षण पध्दतीः मेट्रोपोलीयनः दिल्ली १९८५.

५४) वाखारकर दि.गो. - शारीरिक शिक्षणाचे अध्यापनः निलकंठ प्रकाशन, पुणे १९९१

५५) श्रीवास्तव अभयकुमार - शारीरिक शिक्षा मे परीक्षण और मापनः प्रकाशक हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती १९९०

५६) असनारे एम.एच. - शारीरिक शिक्षा मे परीक्षण और मापन:
असनारे प्रकाशन, अमरावती १९९०

५७) जेरेट टे.ई. - शिक्षा और मानविज्ञान मे संख्यिकी के प्रयोग:
कल्याणी पब्लिशर्स, लुधीयाना.

५८) शर्मा जे.डी. - शरीर क्रिया - मनोविज्ञान: विनोद पुस्तक मंदिर,
आग्रा १९९०

५९) दोशी विजया - व्यायामाचे शरीरि क्रियाशास्त्र
सुयोग प्रकाशन अमावती-१९१४.

६०) मलैय्या के.सी. - शरीर क्रिया - विज्ञान: विनोद पुस्तक मंदिर, आग्रा १९९०

६१) देशपांडे सु.ह. - मानव क्रिया-विज्ञान:
प्रकाशक हनुमान व्यायाम प्रकसारक मंडळ,
अमरावती-१९९२

६२) जेजुरीकर कृ.न. - शारीरिक शिक्षण आणि लष्करी शिक्षण:
कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे-१९६३.

६३) वाखारकर दि.गो. - महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षणाची वाटचाल,
मराठवाडा सांस्कृतिक मंडळ, औरंगाबाद-१९७३

६४) कोठीवाले द.ब. - शारीरिक शिक्षणाचा विकास, भाग-१, ऐतिहासिक,
ठोकळ प्रकाशन, पुणे-१९६५.

६५) कोठीवले द.ब. - शारीरिक शिक्षणाचा विकास, भाग-२, तात्त्विक,
ठोकळ प्रकाशन, पुणे-१९६५.

६६) शर्मा पी.डी. - पंचकार्य एवं प्रशिक्षण : ए.पी. पब्लिशर्स,
जालंधर १९९३.

६७) कंवर आर.सी. - निर्णयम एवं अधिशिक्षा : अमित ब्रदर्स,
नागपूर - १९९३

६८) भागवत के.पी. - शरीर संपदा : मीनल प्रकाशन, कोल्हापूर १९९०.

६९) भागवत के.पी. - शास्त्रोक्त व्यायाम : मिनल प्रकाशन, कोल्हापूर १९९०

७०) भागवत के.पी. - व्यायाम दिपीका : मिनल प्रकाशन कोल्हापूर १९९८

७१) वर्मा के.के. - स्वास्थ्य एवं शारीरिक शिक्षा : प्रकाश ब्रदर्स पब्लिशर्स १९९२.

७२) शर्मा व्यास देव - शारिरीक एवं स्वास्थ्य शिक्षा : आशा प्रकाशन, दिल्ली - १९९३.

७३) विष्ट बी.एल. - शारीरिक विज्ञान : सरीता बुक हाऊस, दिल्ली १९९१.

७४) कौषीक अशोक - शारीरिक प्रशिक्षण एवं पी.टी. ड्रील-१९९०.

७५) पांण्डेय लक्ष्मीकांत - भारतीय खेलो की मीमांसा, मेट्रोपोलीटन, दिल्ली १९८२.

७६) पाण्डेय लक्ष्मीकांत - भुले दिसरे खेल : मेट्रोपोलीटन, दिल्ली १९८३.

७७) भल्ला अजय - शारीरिक शिक्षा एवं खेल : आशा प्रकाशन, दिल्ली १९९३

७८) बाबर सरोजीनी - स्त्रियांचे खेळ व गाणी : महाराष्ट्र राज्य शिक्षण संचनालय, पुणे - १९७७.

७९) वैद्य ब.ल. - आरोग्यासाठी योगासने : मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई - १९८३.

८०) सत्यपाल - वैज्ञानिक योगासन और स्वास्थ्य : किताबघर, दिल्ली १९९३.

८१) आयंगार बी.के.एस. - योग दिपीका : ओरीयन्ट लॉगमन, मुंबई १९९३

८२) भट शे.शो. - प्रलेखन परिचय महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, दत्तसन्स प्रकाशन, नागपूर-१ प्रथमावृत्ती १९९६

८३) डॉ. संत दु.का. - शोधविज्ञानकोष फ्रेब्रुवारी १९७८.

८४) डॉ. मालसे स.गं. - शोधनिबंधाची लेखन पध्दती, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे - नागपूर, १९७५.

८५) Agrwal J.C. - Educational Research - An Introduction
New Delhi. Arya Book Depot : १९६६.

८६) Clerk David H & Clerk H. Harrison - Research Processes in Physical Education
Recreation and Health.
Englewood Cliffs (N.J)
Prentice Hall Inc. १९७०

८७) Dewey. John - How we Thank. Boston.
D.C. Health & Co १९३३

८८) Dostion. Charles O - & Kirkendall. Dow R. Statistics for Physical Educational Research
New York. Harper & Row. १९७४.

८९) Fox. David J. - The research Process in Education.
New York; Holt. Rinehart and Winston
१९६९


—